▪ RNI NO. MAHMAR/25/A3029

▪ लातूर

▪ वर्ष : ७ वे, अंक नं. : ५०

▪ दि. १२ जून २०२६, वार : शुक्रवार

▪ पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# दादा ज्याप्रमाणे कठोर निर्णय घेत होते, तसे निर्णय मीही घेईन

## राष्ट्रवादीच्या वर्धापन दिनी सुनेत्रा पवारांचा नेत्यांना अप्रत्यक्ष इशारा

**मुंबई/प्रतिनिधी :** कुणाचाही अनावश्यक हस्तक्षेप असेल तर मी त्याची दखल घेईन. दादा ज्याप्रमाणे कठोर निर्णय घेत होते, तसे निर्णय मीही घेईन, असे सांगत राष्ट्रवादीच्या अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सूचक इशारा दिला आहे. त्या राष्ट्रवादीच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात बोलत होत्या.

तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राष्ट्रवादीचा पहिला वर्धापन दिन साजरा करण्यात आला. पक्षाच्या प्रमुख तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अनेक वरिष्ठ नेते या कार्यक्रमाला उपस्थित राहिले. दिवंगत नेते अजित पवार यांच्या स्मृतींना समर्पित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात पक्षाच्या भविष्यातील वाटचालीवर, संघटन विस्तारावर आणि कार्यकर्त्यांनी घ्यावयाच्या भूमिकेवर विविध नेत्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पक्षाच्या प्रमुख या नात्यानं सुनेत्रा पवार यांनीही कार्यकर्त्यांना संबोधित केले.

भाषणादरम्यान अजितदादांचा उल्लेख होताच त्यांच्या पत्नी तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना गहिवरून आले. काही क्षण त्या भावुक झाल्याचं पाहायला मिळाले. सभागृहातील वातावरणही यावेळी भावनिक झाले होते. पण, त्यानंतर सुनेत्रा पवार यांनी पक्षाच्या हस्तक्षेपाबद्दल भाष्य केलं.

यापूर्वी जे घडलं ते मी पाहिलं आणि समजून घेतलं आहे. दादांनी सगळ्यांना मान-सन्मान दिला. पदं दिली. मात्र, यापुढे मी पक्षाच्या




हिताला प्राधान्य देईन. कुणाचाही अनावश्यक हस्तक्षेप असेल तर मी त्याची दखल घेईन. दादा ज्याप्रमाणे कठोर निर्णय घेत होते, तसे निर्णय मीही घेईन. अधिक जागृतपणे काम करा. मला कठोर भूमिका घेण्याची वेळ येणार नाही, अशीच अपेक्षा आहे, असे सांगत सुनेत्रा पवार यांनी कठोर पवित्रा घेणार असल्याचे स्पष्ट संकेत दिलेत.

महामंडळांच्या नियुक्त्या करताना पक्षासाठीचे समर्पण आणि त्याग यांचा विचार केला जाईल. आपण सर्वजण मिळून निर्णय घेऊ. गुणवत्ता, पक्षासाठीचे योगदान आणि पक्षवाढीसाठी केलेले काम याला महत्त्व दिलं जाईल. केवळ किती वर्षे काम केले? यापेक्षा त्या काळात पक्ष किती वाढला याचा विचार केला जाईल. काही लोकांना पक्षवाढीसाठी सोबत घेताना त्यांचा योग्य सन्मान करावा लागतो. आपल्या विचारांशी आपण कधीही तडजोड केली नाही. यापुढेही केली जाणार नाही, याची मी ग्वाही देते-उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

राष्ट्रवादी काँग्रेसच्या २७ व्या वर्धापनदिन सोहळ्यात पक्षाच्या वाटचालीपेक्षा प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांनी केलेल्या वक्तव्यांचीच अधिक चर्चा रंगली. ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्यावर मिश्कील टोले लगावताना तटकरे यांनी त्यांच्या राजकीय शैलीचं कौतुकही केले. यामुळे पक्षाच्या वाटचालीपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अंतर्गत मतभेदांच्या चर्चांना पुन्हा एकदा उधाण आले. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत बोलताना तटकरे यांनी भुजबळ यांच्या 'मी कबड्डीचा खेळाडू आहे, बुद्धीबळाचा नाही' या विधानाचा उल्लेख करत त्यावर भाष्य केले.

छगन भुजबळ हे केवळ कबड्डीचे खेळाडू नाहीत..!- छगन भुजबळ हे केवळ कबड्डीचे खेळाडू नाहीत, तर ते उत्तम कलाकार आणि निर्मातेही आहेत. कबड्डीच्या खेळात त्यांनी अनेक खेळाडूंना बाद केलं आहे. शिवसेनेत असताना त्यांनी दोन वेळा महापौरपद मिळवले. त्यावेळी त्यांनी कोणाला 'चेकमेट' केले होते? असा सवाल तटकरे यांनी उपस्थित केला. आपल्या पक्षात सर्व प्रकारचे खेळाडू आहेत आणि हे सर्व खेळाडू अजितदादांनी तयार केले आहेत, असेही ते म्हणाले.

राज्यसभेच्या जागेवरून छगन भुजबळ हे नाराज होते. राज्यसभेत जाण्याची त्यांची इच्छा असताना राजेंद्र जैन यांना राष्ट्रवादीनं उमेदवारी जाहीर केली. त्यावेळी नाराज झालेल्या भुजबळांनी मी बुध्दीबळाचा नाही तर कबड्डीचा खेळाडू आहे असं विधान केलं होतं. त्याचबरोबर तटकरे कुटुंबाला जो न्याय मिळतो तो आम्हाला का नाही? असा सवाल उपस्थित केला होता. यामुळे सुनिल तटकरे यांनी केलेल्या टोलेबाजीची चर्चा रंगली.

याचबरोबर गेल्या अनेक दिवसांपासून सुनिल तटकरे आणि पार्थ पवार यांच्यात अंतर्गत कलह दिसून येत होता. यावेळी पार्थ पवार हे व्यासपीठावर होते. अजित पवारांनी आतापर्यंत कश्या पद्धतीनं काम केले हे सांगताना पार्थ पवारांना उद्देशून तटकरेंनी काही गोष्टींचा उल्लेख केला. त्याचबरोबर कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत पार्थ पवारांचं कौतुक केलं.

२००४ सालचा तो निर्णय चुकला? दरम्यान, २००४ च्या राजकीय घडामोडींचा संदर्भ देताना तटकरे म्हणाले की, त्यावेळी काँग्रेसकडून अधिक जागा मिळवण्यासाठी मोठे प्रयत्न झाले होते. विदर्भात राष्ट्रवादीला सर्वाधिक जागा मिळाल्या होत्या. सर्वाधिक जागा जिंकणाऱ्या पक्षाचा मुख्यमंत्री ठरवण्याची पद्धत असती, त्यावेळी आपलाच मुख्यमंत्री झाला असता. २०१९ मधील पहाटेच्या शपथविधीबाबत बोलताना तटकरे यांनी तो 'पहाटेचा शपथविधी' नसल्याचा दावा केला. त्या काळात सोबत राहिलो असतो, तर पुढे वेगळे चित्र दिसले असते, असे ते म्हणाले.

अजित पवार यांनी २ जुलै २०२३ रोजी एनडीएमध्ये जाण्याचा निर्णय 'छातीवर दगड ठेवून' घेतल्याचे सांगत तटकरे यांनी त्यांच्या नेतृत्वाचं कौतुक केले. लोकसभा निवडणुकीनंतर अजित पवार यांनी घेतलेल्या ठोस भूमिकेमुळे विधानसभेत यश मिळाले. त्यांनी विधानसभा निवडणुकीत ७२ टक्के स्ट्राइक रेट नोंदवला, असे तटकरे म्हणाले. टीका-टिप्पणी होत राहणार असली तरी पक्षाची वाटचाल सुरूच राहील, असा विश्र्वासही त्यांनी व्यक्त केला.

रोहीत पवारांवर अप्रत्यक्ष टीका? - यानंतर तटकरे यांनी २०१९ मधील राजकीय घडामोडींचा संदर्भ देत टीकाकारांवर निशाणा साधला. आज आमच्यावर गद्दारीची आणि भाजपासोबत जाण्याची टीका केली जाते. मात्र, २०१९ मध्ये अजित पवार यांच्या शासकीय निवासस्थानी पक्षाचे सर्व आमदार एकत्र बसले होते. त्यावेळी भाजपासोबत सत्तेत सहभागी व्हावे, अशी भूमिका मांडणारे पत्र तयार करून ते शरद पवार यांना देण्यात आले होते. त्या पत्रावर सर्व आमदारांच्या सह्या होत्या, असा दावा त्यांनी केला. आज टीका करणाऱ्यांनी इतिहास आठवावा. त्या पत्रावर सर्वप्रथम सही कुणाची होती, याचाही शोध घेतला पाहिजे. आता तो कागद बाहेर काढण्याची वेळ आली आहे, असेही तटकरे म्हणाले.

सुनेत्रा पवार यांचा रोख कुणाकडं?२०१९ मध्ये अजित पवार यांनी घेतलेला निर्णय कायम राहिला असता, तर महाराष्ट्राचे सध्याचे राजकारण पूर्णपणे वेगळे दिसले असते, असे मतही तटकरे यांनी व्यक्त केले. त्यांच्या या वक्तव्यांमुळे राष्ट्रवादीतील अंतर्गत राजकारण आणि २०१९ मधील घडामोडींवरील चर्चा पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी कठोर भूमिका घेणार असल्याचे संकेत दिल्यानंतर त्यांचा रोख कुणाकडे याची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

## लातूर जिल्ह्यात रविवारी ३२ परीक्षा केंद्रांवर महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात रविवार, १४ जून २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ दरम्यान ३२ उपकेंद्रांवर महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा पूर्व परीक्षा-२०२६ आयोजित करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी सर्व परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात परीक्षेदिवशी सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू केले आहे.

या आदेशानुसार परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थीशिवाय पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करण्यात आली असून, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यास किंवा शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच परीक्षा कालावधीत केंद्राच्या १०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपिंग सेंटर, एसटीडी बूथ आणि ध्वनिक्षेपक ही सर्व माध्यमे बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. परीक्षा केंद्रात मोबाईल फोन, सेल्युलर फोन किंवा इतर कोणतीही प्रसार माध्यमे घेऊन प्रवेश करण्यास मनाई असेल, तसेच कोणत्याही अनधिकृत व्यक्तीला किंवा वाहनाला केंद्र परिसरात प्रवेश दिला जाणार नाही. हे निर्बंध परीक्षा कर्तव्यावर असलेल्या अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस प्रशासनास लागू नसून, परीक्षेचे कामकाज शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनाने हे प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

## मुलाला वाचविण्यासाठी गेलेल्या आईसह मुलाचा नदीत बुडून मृत्यू, समशेरपूरमधील घटना

**अकोला/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील समशेरपूर येथे अधिक मासानिमित्त नदीवर स्नानासाठी गेलेल्या माय-लेकाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. वृषाली हरिदास खोत (३५) आणि स्वराज हरिदास खोत (१०) अशी मृतांची नावे आहेत. अधिक महिन्यात घडलेल्या या दुर्घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. मुलाला वाचवण्यासाठी नदीत उडी मारणाऱ्या आई आणि मुलाचा बुडून मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, गावातील काही महिला आणि एक दहा वर्षीय मुलगा नदीवर आंघोळीसाठी गेले होते. यावेळी स्वराज खोत याला पाण्याचा अंदाज न आल्याने तो खोल पाण्यात जाऊन बुडू लागला. आपल्या मुलाला वाचवण्यासाठी आई वृषाली खोत यांनी तत्काळ पाण्यात उडी घेतली. मात्र दोघांनाही पोहता येत नसल्याने ते पाण्याच्या प्रवाहात वाहू लागले. हे पाहून त्यांच्यासोबत असलेल्या माधुरी खोत आणि मीरा चौधरी यांनीही मदतीसाठी नदीत उडी घेतली. मात्र त्याही पाण्यात अडकल्या. आरडाओरडा ऐकून नदीजवळ उपस्थित युवकांनी घटनास्थळी धाव घेत पाण्यात उडी मारली आणि मोठ्या प्रयत्नांनंतर माधुरी खोत, मीरा चौधरी यांना सुखरूप बाहेर काढलं.

यानंतर वृषाली खोत आणि स्वराज खोत यांचा शोध सुरू करण्यात आला. काही वेळानंतर दोघांचेही मृतदेह पाण्यात आढळून आले.

## बसस्थानकातील सोनसाखळी चोरीचा अवघ्या काही तासांत छडा; महिला चोरट्यास गांधी चौक पोलिसांची अटक

**लातूर/प्रतिनिधी :** प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत मध्यवर्ती बसस्थानक परिसरात महिलांच्या दागिन्यांवर डल्ला मारणाऱ्या एका सराईत महिला चोरट्यास गांधी चौक पोलिसांनी अवघ्या काही तासांत जेरबंद करत चोरीस गेलेले ७० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत. तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहिती आणि पोलिसांच्या तत्पर तपासामुळे हा गुन्हा उघडकीस आला असून आरोपी महिलेने यापूर्वी केलेल्या आणखी एका चोरीची कबुलीही दिली आहे.

दि. ९ जून २०२६ रोजी रात्री सुमारे ९.४५ वाजण्याच्या सुमारास मध्यवर्ती बसस्थानक, लातूर येथे ही घटना घडली होती. फिर्यादी ह्या आपल्या आईला पुणे येथे जाणाऱ्या बसमध्ये बसविण्यासाठी बसस्थानकात आल्या होत्या. आईला बसमध्ये बसवून खाली उतरत असताना त्यांच्या आईने सुरक्षिततेसाठी त्यांच्याकडे दिलेले सुमारे १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने लंपास केले.

या प्रकरणी गांधी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४०३/२०२६, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक अमोल




तांबे यांनी तातडीने गुन्ह्याचा छडा लावण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण व उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड यांचे नेतृत्वात तपास पथकाची नियुक्ती केली.

तपासादरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरील उपलब्ध माहिती, तांत्रिक विश्लेषण, संशयितांची पडताळणी तसेच आलेल्या माहितीनुसार पोलिसांनी सापळा रचून अर्चना अजय भोसले (वय २६ वर्षे, रा. गावठाण माही, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) हिला ताब्यात घेतले.

सखोल चौकशीदरम्यान आरोपी महिलेने बसस्थानक परिसरात फिर्यादीचे सोन्याचे दागिने चोरी केल्याची कबुली दिली. तिच्याकडून चोरीस गेलेले १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले.

याचबरोबर आरोपीकडे अधिक तपास केला असता तिने गांधी चौक पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक ४२/२०२६, कलम ३०३(२) बीएनएस मधील चोरीचा गुन्हाही केल्याचे कबूल केले आहे. त्यामुळे तिच्याकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असून गांधी चौक पोलीस पुढील तपास करत आहेत.

ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, यांचे सूचनेवरून अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण आणि उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड, यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस उपनिरीक्षक प्रमोद देशमुख, फौजदार कांदे ,राजेंद्र टेकाळे, राम गवारे, संतोष गिरी, रविसन जाधव, सचिन चंद्रपाटले, शिवा भाडुळे, पद्माकर सुरवसे, महादेव फुले, सचिन जाधव, युनूस शेख, महिला पोलीस अंमलदार अनुराधा डोंगरे, सुमन कोरे यांनी पार पाडली.

## नागपुरात मुस्लिम समाजाचं लक्षवेधी आंदोलन; गायीला राष्ट्रीय पशूचा दर्जा देण्याची मागणी

**नागपूर/प्रतिनिधी :** गायीला राष्ट्रीय पशू घोषित करण्यात यावं, या मागणीसाठी मुस्लिम समाजाच्यावतीनं लक्षवेधी आंदोलन करण्यात आलं. शांततापूर्ण पद्धतीनं करण्यात आलेल्या या आंदोलनातून आंदोलकांनी आपली मागणी जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवली.

गायीला राष्ट्रीय पशू घोषित करण्याबाबत देशभरात विविध स्तरांवर चर्चा सुरू असताना नागपुरात एक आगळे-वेगळे चित्र पाहायला मिळाले. मुस्लिम समाजातील बांधवांनी संविधान चौकात एकत्र येत गायीचे धार्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिक महत्त्व अधोरेखित केले. केंद्र सरकारने गायीला राष्ट्रीय पशूचा दर्जा द्यावा, अशी मागणी त्यांनी यावेळी केली. तसेच घोषणाबाजी करत आंदोलकांनी आपली भूमिका स्पष्टपणे मांडली.

गायीचे संरक्षण आणि संवर्धन करणं हे सर्व समाजाचं कर्तव्य असल्याचं मत आंदोलकांनी व्यक्त केलं. देशात गोसंवर्धनासाठी अधिक प्रभावी धोरण राबवण्याची आवश्यकता असल्याचंही त्यांनी नमूद केलं. संविधान चौक परिसरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. हे आंदोलन शांततेत पार पडलं असून, या अनोख्या आंदोलनाने नागरिकांचं लक्ष वेधून घेतलं. या विषयावर कुणीही राजकारण करू नये, असं आवाहनही मुस्लिम समाजाच्यावतीनं करण्यात आलं आहे. देशभरात गोहत्या पूर्णपणे थांबवण्यात यावी, अशी मागणीही यावेळी मुस्लिम समाजाच्यावतीनं करण्यात आली.

## सज्जात न राहणाऱ्या तलाठ्यांवर तात्काळ कार्यवाही करावी : प्रदीप पाटील खंडापूरकर

**लातूर/प्रतिनिधी :** जे तलाठी सज्जात राहत नाहीत, सज्जात जात नाहीत त्यांच्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. ज्यांची तलाठी कार्यालये बेकायदेशीररित्या शहरात आहेत, ते बंद करण्याची मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

लातूर तालुक्यातील कासारखेडाचे मंडळ अधिकारी महेश हिप्परगे यांच्याबाबत लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी दिलेल्या अहवालावरून जिल्हाधिकाऱ्यांनी हिप्परगे यांच्यावर केलेली निलंबनाच्या कार्यवाहीचेही खंडापूरकर यांनी या निवेदनात समर्थन केले आहे. जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी पुढे असे नमूद केले आहे की, महेश हिप्परगे यांच्याबाबत शेतकऱ्यांच्या अनेक तक्रारी आहेत. ते शेतकऱ्यांना उद्धट आणि मग्रूर पद्धतीने बोलतात. शेतकऱ्यांचे फेरफार लवकर मंजूर करत नाहीत. अशा कामांना



जाणीवपूर्वक विलंब करतात. एवढेच नाही तर हिप्परगे हे आपल्या हाताखालील सहकारी तलाठ्यांना धमकावण्याचा कामही करतात. एका तलाठ्याने हिप्परगे यांनी मारण्याची धमकी दिल्याची तक्रार केली होती. त्यांच्या त्रासाला कंटाळून संबंधित तलाठ्याने नोकरी सोडण्याची तसेच आत्मदहन करण्याची धमकी दिल्याचाही प्रकार घडला आहे. तसेच संबंधित तलाठ्याने हिप्परगे यांच्या त्रासाला कंटाळून बदलीची मागणी वरिष्ठांकडे केल्याचा प्रकारही सर्वज्ञात आहे.

मागील वर्षी लातूर ग्रामीणचे आमदार रमेशप्पा कराड यांच्या ममदापूर येथे पार पडलेल्या जनता दरबारात अनेक शेतकऱ्यांनी हिप्परगे आम्हाला धमक्या देतात, तुमचे काम करत नाही, तुम्हाला कोणाकडे जायचे आहे जा, माझी सुद्धा लांबपर्यंत पोहंच आहे,अशा भाषेत बोलल्याचे अनेकांनी पाहिले - ऐकले आहे. त्यामुळे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी महेश हिप्परगे यांच्याबाबत दिलेल्या अहवालाचे आम्ही समर्थन करतो. हिप्परगे यांच्या समर्थनार्थ तलाठी संघटनेने त्यांचे निलंबन मागे घेण्याच्या मागणीसाठी काम बंद आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. मुळातच जे तलाठी सज्जात राहत नाहीत. सज्जात जात नाहीत. सर्वांची तलाठी कार्यालये बेकायदेशीररित्या शहरामध्ये असल्याने शेतकऱ्यांना तलाठ्यांकडे जाण्यासाठी नाहक भुर्दंड सोसावा लागतो. त्यामुळे जे तलाठी सज्जात राहत नाहीत, सज्जात जात नाहीत, ज्यांची कार्यालये शहरामध्ये आहेत सर्वप्रथम त्यांच्यावर कडक कार्यवाही करण्यात यावी. अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर बेकायदेशीररीत्या चालणाऱ्या तलाठी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशाराही प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी दिला आहे. या निवेदनाच्या प्रति निवासी उपजिल्हाधिकारी , तहसीलदार लातूर यांनाही देण्यात आल्या आहेत. निवेदन देताना प्रदीप पाटील खंडापूरकर यांच्यासमवेत समितीच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा राणीताई स्वामी, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य पृथ्वीराजसिंह पाटील खंडापूरकर, वैभव घोबाळे, शिवा काळे पाटील, सुरेखा गाडेकर,काशीबाई हांडे, अज्ञानताई माने, महेश पाटील आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# आदर्श व्यक्तिमत्व : सी.के.मुरळीकर

**निगर्वी, प्रामाणिकपणा, स्वाभिमानी बाणा, सचोटी, जिद्द, संघर्षशील वृत्ती, टापटिप, गरीबांप्रती कणव, अन्यायाची चिड असणारे, संस्कारी,निर्व्यसनी, मितभाषी,सर्वसामान्यांप्रती नेहमीच आस्था असणारे आणि स्नेहभाव वृध्दींगत करुन सदाचारी माणसं जोडणारे लातूर जिल्हा शिवसेना सह संपर्कप्रमुख चंद्रनाथ उर्फ सी.के.मुरळीकर यांचा आज(१२ जून २०२६) रोजी ७५ वा वाढदिवस त्यानिमित्ताने हे शब्दरुपी अभिष्ठचिंतन...**

उस्मानाबाद जिल्ह्यातील मुरळी (ता.उमरगा) येथील नरसाबाईला कर्नाटकातील किनी या खेड्यात खंडाप्पा मुरळीकर यांना दिलेलं. खंडाप्पाची गरीबी परिस्थिती, हिला तिकडची कन्नड भाषा कळंना त्यामुळे मामा मारोतीराव सूर्यवंशी यांनी तिचा इथं निभाव नाही लागणार म्हणून मुरळीला आणलं.मारोतीराव यांच्याकडे दहा एकर शेती,किराणा दुकान,म्हणजे बऱ्यापैकी परिस्थिती होती. राजकारण, समाजकारणात त्यांचा बर्यापैकी वावर. खंडाप्पा आणि नरसाबाई यांना पांडुरंग, विश्वनाथ,काशिनाथ, चंद्रनाथ आणि गुलचंद ही पाच मुले आणि वत्सला वाघमारे (सासंर आचलेर) आणि सुलोचना सूर्यवंशी (पुणे)या दोन कन्या असा हा परिवार.आई रोजीरोटीसाठी कोणाच्याही शेतावर,कधी मामाच्या घरी राबायची, बापाला कुस्तीचा लई नाद. पंचक्रोशीत कुस्त्या खेळत,खेळत ते हमेशा बाहेर असायचे.कोणाची सोयरिक जमव,कोणाची खबर सांग,कोणी मेल्यानंतर त्याच्या साठी खड्डा खोदून त्यात बसून बघण्यापर्यंत त्यांचा पुढाकार असायचा,एक प्रकारे सामाजिक बांधिलकी, माणूसकीचा ओलावा त्यांच्या मनी होता.घरी आईची ओढाताण व्हायची. त्यांच्या शेजारी महाराचे हणमंत जवळगे होते.त्यांना संतती नव्हती.ते त्यांना बडी ज्वारीच्या भाकरी अधून मधून देत, त्याचं त्यांना मोठं अप्रुप वाटायचं.घरी आई-बहिणी राळे,वरईच्या पिठात अंबाड्याची भाजी शिवजून भाकरी करायच्या त्यावर गुजारा व्हायचा. एके दिवशी त्यांचे मधले भाऊ विश्वनाथ दादा.त्यांनी घरचा विचार करुन मामाच्या किराणा दुकानात राबायचं ठरवलं. तसेच घरची दैना दूर करण्यासाठी चंद्रनाथला शिकवून सायेब करावं,असा ठाम निर्धार त्यांनी केला. एके दिवशी चंद्रनाथला नवव्या वर्षी मामानं गावातल्या खाजगी शाळेत नेवून बसवलं. विश्वनाथ दादाची बायको सत्यभामा,त्यांचा दीर चंद्रकांतवर मोठा जीव.दीर शिकतोय याचा त्यांना आनंद होता म्हणून घासातला घास आईसारखं काढून ठेवायच्या.सर्वांच्या सहाकार्यामुळे चंद्रनाथने चौथीपर्यंत मुरळीच्याच शाळेत शिक्षण घेवून चांगले गुण संपादन केले.

गावात पाचवीचा वर्ग नव्हता म्हणून दादाने तीन किलोमीटरवरील कदेरच्या खाजगी शाळंत नाव घालून टाकलं. चंद्रनाळची रोज एकटाच पायपीट करत शाळा सुरु झाली.इंग्रजी आणि गणित हे विषयक चंद्रनाळला आवड नसलेले.मग हातावर गुरुजीच्या छड्या पडल्या नाही तर नवलंच. या नेहमीच माराच्या भीतीनं काय करावं तेच त्यांना सुचना.मग एक युक्ती सूचली,ती म्हणजे गावाजवळच्या मामाच्या उसाच्या फडात जावून दिवसभर बसायचं.शाळा सुटायची वेळ झाली की घरी परतायचं. ही गोष्ट दादा व मामांच्या लक्षात आली. पण बरेच दिवस आणि वर्षही वाया गेलं.म्हणून दादानं दुसर्या वर्षी हेडमास्तर आणि गुरुजींना प्रत्यक्ष भेटून माराच्या भीतीनं पोरंग शाळा बुडवतंय जरा सांभाळून घ्या अशी विनंती केली. चंद्रनाथ मग पुन्हा शाळेत जायला लागला. सातवी चांगल्या मार्कांने तो पास झाला. पुन्हा पुढे कुठे शिकायचे तर मग नऊ किलोमीटर अंतरावरील मुरुमला. तिथं जिल्हा परिषदेची प्रशाला होती. त्यात आठवीला प्रवेश घेतला. आई,भावजय डबा करुन द्यायच्या आणि शेताच्या पाऊलवाटंनं चंद्रनाथ पाठीवर दप्तर टाकून एकटाच सकाळी ८ते १० या वेळात शाळा गाठायचा. दिवसभर शाळा करुन पुन्हा मुरळीचा रस्ता धरायचा. त्याकाळी या गावात शिक्षण घेणारा तो एकमेव विद्यार्थी होता. दादा कधी कधी किराणा दुकानातलं सामान संपलं की ते मुरुमहून आणायला सांगायचा. तेही ओझं घेवून चंद्रनाथ गाव जवळ करायचा. मामाच्या घरचं दळण,जळण,भाजीपाला व इतर कामं चंद्रनाथच्या घरातील बहुतेकांना व दादांना करावी लागायची.परिस्थितीची जाणीव ठेवत चंद्रकांत वेळातला वेळ काढून अभ्यास करायचा.आठवी,नववी झाली आणि १९७१ ला तो दहावीही चांगल्या गुणांनी पास झाला.याचा घराच्या सर्वांना विशेषतःदादाला खुप आनंद झाला. पुढच्या पी.यु. सी.साठी दादानं उमरगा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयात घातलं. जेवणाची व झोपण्याची भारत विद्यालयाच्या वसतीगृहात सोय झाली. महाविद्यालयीन काळात त्यांने वक्तृत्व स्पर्धात भाग घेतला. त्याबद्दल ग्रंथ बक्षीसही मिळाले. चंद्रनाथला हिंदी विषयाची विशेष आवड.हिंदी वाङ्मय मंडळाचे ते एक वर्षे सेक्रेटरी झाले.शिकायला मिळालेल्या संधीचं सोनं करत चंद्रकांतने १९७५ बी.ए.द्वितीय श्रेणीची पदवी मिळवली.

घरच्यांना चंद्रनाथने लहानमोठी नोकरी करावी असं वाटायचं पण चंद्रनाथची पुढं शिकण्याची इच्छा होती.त्यांना दादाची साथ होती हे वेगळे सांगणे नको. औरंगाबाद मराठवाडा विद्यापीठात जावं असा पर्याय भूसणीचा राम कांबळे,जहांगीर आष्टाचा सदाशिव सूर्यवंशी,ज्ञानोबा सूर्यवंशी,इंद्रजित कांबळे यांच्याशी चर्चेतून पुढे आला. मुरुमचे गायकवाड यांचे एक भाऊ औरंगाबादेत होते.त्यांचे सहकार्य मिळाले. विद्यापीठात एम.ए.हिंदी या आवडीच्या विषयात प्रवेश मिळाला.प्रवेश झाला पण निवास-भोजनाचे काय?पण इच्छा तिथं मार्ग म्हणतात तसं विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.शंकरराव खरात यांनी चंद्रनाथचा बोलका स्वभाव,परस्नॅलीटी,अभ्यास आणि चांगली हिंदी पाहून बॉईज हॉस्टेलमध्ये मोफत राहण्याची संधीच मिळवून दिली.हॉस्टेलमधील मित्रांचा भडकलगेट, बेगमपूरा येथील खानावळातून डबा यायचा. ते चंद्रनाथला सोबत घेवून जेवत.थोडीशी शिष्यवृत्ती मिळायची.विदर्भासह मराठवाड्या तील विशेष आंबेडकरी चळवळीतील विद्यार्थी मित्रांची ओळख झाली,जी पुढेकामी आली.याच काळात कदेरचे आता पोलीस अधिकारी झालेले उध्दव कांबळे हे समाजशास्त्र आणि माळकोंडजीचे पांडुरंग अडसुळे हे एम.ए.हिंदीला होते.एकदा विद्यापीठामध्ये युनोमध्ये हिंदीचे महत्व,या विषयावर वक्तृत्व स्पर्धा झाली.त्यात उध्दव कांबळे प्रथम तर चंद्रकांत मुरळीकर दुसरे आले. एम.ए.चा निकाल लागला.५६ टक्के म्हणजे द्वितीय श्रेणी मिळाली. अशात उस्मानाबादच्या रामकृष्ण परमहंस बी.एड. कॉलेजची जाहिरात आली होती. त्यात जोडकार्ड पाठविण्यास सांगितले होते.त्याप्रमाणे चंद्रनाथने त्या कॉलेजला पत्र पाठविले आणि आंधळा मागतो एक आणि...या प्रमाणे प्राचार्य राणे यांनी त्यांची चांगली टक्केवारी पाहून त्वरीत प्रवेश घेण्यासाठी या. कसलीही अडचण येणार नाही असे कळविले. वसतीगृहाची सोय होतीच.वर्षभर मन लावून अभ्यास केला आणि ७७ टक्के मार्क्स घेवून चंद्रकांत मुरळीकर बी.एड.झाले.ज्या घरात शिक्षणाचा गंध नाही तिथे पदव्युत्तर शिक्षण घेणारे घरात नव्हे तर गावातले पाहिले ते पदवीधर ठरले. मध्यंतरीच्या काळात चंद्रनाथने पोलीस उपनिरीक्षक पदासाठी दोन वेळा लेखी आणि शारीरिक परिक्षा दिली.ते पासही झाले. मग सुशीलकुमार शिंदे,डॉ.निलंगेकर, सदानंद वर्दे, नाशिकराव तिरपुडे, कस्तूरे, डी.डी.चव्हाण, धोंडीबा अहिरे या मंत्र्यांनी हा मुलगा चांगला आहे म्हणून गृहमंत्री शरद पवारांकडे शिफारशी केल्या. निवड झालेल्या उमेदवारांची फोर्ट येथे दुपारी यादी लागली.त्यात मुरळीकरांचे नाव होते.याचा त्यांना खुपच आनंद झाला!पण रात गई बात गई म्हटल्याप्रमाणे ना.शालिनीताई पाटलांनी रात्रीतून ती यादी गायब केली. हातातोंडाशी आलेला घास मंत्र्यांच्या दलाली प्रवृत्तीने उलगद हिसकावून नेला आणि बेकारीचे दिवस सुरु राहिले.नोकरी शासनाची आणि पैसे खाणारे मंत्री,अधिकारी ही दलाली नोकरभरती पध्दती काँग्रेसच्या राजवटीत चांगलीच रुजली आणि हजारो गुणवान उमेदवारांना चांगल्या नोकरीला मुकावे लागले. हे पाप काँग्रेसवाल्यांनी २०१० पर्यंत चांगलं करण्यात धन्यता मानली..



आपल्याला नोकरी लागेना,पैसा तर नाही.चंद्रनाथचा लहाना भाऊ मुंबईत मजूरी करायचा. त्याला डेअरीत कामाला लावले. पण त्याला दारुचे व्यसन लागले. ते वाढले गेले.आणि त्यात त्यांचा अत्यंत वाईटपणे लिव्हरचा स्फोट होवून दवाखान्यात अंत झाला. त्याच्या परिवाराची जबाबदारी चंद्रनाथवरच आली. गुलचंदच्या पत्नीला मग त्यांच्या जागेवर कामाला लावले. मग त्याचा परिवार संकटातून बाहेर आला.चंद्रनाथने आईलाही मुंबईला नेले. रेल्वेरुळा लगत टाटा नगरातल्या झोपडपट्टीत अगदी पालासारख्या बकाल भागात ते राहिले.१९७२ च्या दुष्काळाने होरपळलेल्या महाराष्ट्रातील अनेक लोकांनी मुंबईकडे कुच केली होती. मुंबई मनपा झोपड्या तोडायची,त्या पुन्हा उभारायच्या ,त्या पुन्हा तोडल्या जात.मग पँथर नेते रामदास आठवले, त्यांचे पी.ए. यांचे आयुक्तांना फोन जात, तेवढ्यापुरतं थांबायचं पुन्हा मागचेच.गोवंडी,वडाळा,शिवडी, मस्जीद बंदर,कुर्ला या भागातील झोपड्यासाठी शासन दरबारी अर्ज,विनंती,खेटे घालायचे,काही मुस्लिम दादा इथं झोपडं घालायचं तर दहा हजार रुपये काढा म्हणून धमकावायचे, दलित तरुणांना ते सहन व्हायचे नाही.त्यातून मारामाऱ्या, खुनी हल्ले व्हायचे. मग पोलीस ठाण्यात अर्ज,जामीन करुन घ्या,कार्यकर्त्यांना दवाखान्यात नेवून दाखल करा, असा व्याप उत्साहाने चंद्रनाथ पार पाडायचे,ते समाज सेवेचा भाग म्हणून. अशात मराठवाडा नामांतराचा प्रश्न पेटला,उदगीरचे कलवले, चर्चगेटला भेटले, शांताबाई साठेंची ओळख झाली. रामदास आठवले,प्रा.अरुण कांबळे यांच्या नेतृत्वात मंत्रालयावर मोर्चा निघाला.त्यात चंद्रनाथने भाग घेतला. टाटा नगर,मानखुर्द, घाटकोपर या झोपड्यांना संरक्षण, नागरी सुविधा मिळाव्या म्हणून पँथर, दलित संघटना,बँक कर्मचारी संघटनांच्या माध्यमातून ही चंद्रनाथ झटत राहायचे. त्यासाठी रविवारी बैठक घेणे,चर्चा नियोजन वगैरे करायचे.

शिक्षण झालं,चांगले गुण,वशिला मिळाला पण लाच द्यायला पैसा नसल्याने नोकरीसाठी चंद्रनाथला बरेच दिवस खास्ता खाव्या लागल्या.अर्जूनराव कस्तूरे, साहू पोहनेरकर हे अधिकारी आणि पँथर नेते रामदास आठवले,बॅ.राजा ढाले, नामदेव ढसाळ यांच्याही ओळखी झाल्या. झोपड्या तोडू नका म्हणून मंत्रालयावर आठवलेंच्या नेतृत्वात मोर्चा नेण्यात आला, तेव्हा ते स्वतःमुख्यमंत्री शरद पवार यांनी बाहेर येवून चर्चा केली.नोकरीच्या शोधात रात्री साडेतीन वाजायचे रेल्वे चुकली तर रेल्वे स्थानकात पेपर टाकून झोपायचे.सकाळी घर गाठायचे. पोहनेरकर ओळखीचे कॉलेज होते.तिथे मुलाखती साठी ते निघणार पण त्या दोघांच्याही खिशात खडकू नाही,चंद्रनाथला थोडं बाजूला बसवलं. एका खोलीतील काही रद्दी त्यांनी विकली आणि म्हणाले चल आता,ही गोष्टी त्यांनी रेल्वेत जाताना सांगितली. भिवंडीत चर्मकार समाजाच्या जाधवांची एका मोठी शिक्षण संस्था होती. तिथे जातीपेक्षा पैशाला महत्व होते.आष्टाचे सूर्यवंशी आरपीएफमधले बसवंत शेके,हे सर्वजण चंद्रनाथच्या नोकरीसाठी अर्ज करणे जाणे, मुलाखतीसाठी हातभार लावत असत. पोहनेरकरांच्या ओळखीमुळे अनॉसीन कंपनीत नेले पण तिथे डाळ शिजली नाही.मध्येच एके दिवशी युनियन बँक ऑफ इंडियामध्ये कॅशिअर पदाची जाहिरात वृत्तपत्रात आली.त्यासाठी चंद्रनाथने अर्ज भरला. कलवले,पोहनेरकरांनी त्यासाठी बँकेकडे शिफारशी केल्या.सेवा योजन कार्यालय,शिपिंग कॉर्पोरेशनला अर्ज केले.मंत्री सुशीलकुमार शिंदे यांचे सचिव सांगोलाचे भांबरे यांचे मावसभाऊ अशोक व्हटकर यांनी मुंबई मनपाच्या शिक्षणाधिकारी कामतांना फोन लावून एक मुलगा सेवेत घ्या,असे सांगितले.त्याप्रमाणे चंद्रनाथ गेले.ऑर्डर मिळाली आणि ती घेवून वरळीच्या बीडीडी चाळीतील शाळेत शिक्षक म्हणून रुजू होण्यासाठी गेले. मुख्याध्यापक वानखेडेंनी त्याला रुजू करुन घेतलं. ड्युटीसाठी मग रोज गोवंडी,कुर्ला, दादर,परेल,आणि वरळी असा रेल्वे प्रवास करावा लागे. या सेवेत सहा महिने गेले.

अचानक एका दिवशी युनियन बँक ऑफ इंडियाच्या परीक्षेचे हॉलतिकीट हाती पडले. ते चंद्रनाथने हेडमास्तर वानखेडेंना दाखविले,त्यावर वानखेडे म्हणाले, एक तर तुम्हाला रजा मिळणार नाही वा नोकरीचे लाभ मिळणार नाहीत, तर वडील आजारी असल्याचा एक अर्ज देवून जा परिक्षेला असा मोलाचा सल्ला दिला. दुसऱ्या दिवशी कशीबसी परीक्षा झाली.हॉलतिकीटावर फोटोच नाही,खाली आले तर खिशात विद्यापीठीय ओळखपत्रावर फोटो होता.तो नेवून परिक्षक मॅडमला दाखविला,त्यांनी दरडावत बसा म्हणून संधी दिली...४० हजार मुलांतून ४०० उमेदवारांची बँकेने कॅशिअर म्हणून निवड जाहीर केली.मात्र एक कठीण प्रश्न समोर उभा ठाकला.त्यासाठी दोन हजार रुपये सुरक्षा ठेव म्हणून बँकेकडे जमा करणे आवश्यक होते. घरात आणि नातेवाईकांकडे खडकूही नाही.आता काय करायचे? असा विचार करत असताना त्यांना मुरळीचे पण मुंबईत वडापावचा धंदा करणारे सोजर मुल्ला आठवले. त्यांना जावून चंद्रनाथने अडचण सांगितली. पण ते, बग बाबा माझ्याजवळ तर पैसे नाहीत म्हणत त्यांनी,चक्क त्यांच्या बायकोच्या गळ्यातील मंगळसूत्र आणि पायातील पैंजण नेवून विकले आणि दोन हजार हातावर टेकवले.ते चंद्रनाथने बँकेत नेवून जमा केले हाय हायसे वाटले.५ एप्रिल १९७९ रोजी त्यांना नेव्ही नगर कुलाबा येथील शाखेत प्रथम कॅशिअर म्हणून कामाची ऑर्डर मिळाली. काम प्रामाणिकपणे करायचे पण अन्याय सहन करायचा नाही,असा मानी स्वभाव चंद्रनाथचा, तिथल्या मुस्लिम बँक अधिकाऱ्याने एका मागासवर्गीय कर्मचार्याला पाडून बोलले,ते चंद्रनाथला सहन झाले नाही. त्यांनी मॅनेजरला याचा जाब विचारला, वर्तन सुधारा असी तंबी दिली.त्यामुळे मॅनेजरने चिडून जावून मुरळीकर यांना दुपारी १२ ते सायंकाळी ७ या वेळात भरपूर कामाचा भार लादला.तो ते उचलत राहिले.आपण सेवेत आलोत.पण आपल्या सारखे इतर मागास, अनाथ, गरीब, सातवी, दहावी झालेल्या रेल्वेत उदबत्ती विकणार्या पोरांनाही शिपाई,कँटिनबॉय,विमानात सफाई कामगार म्हणून नोकरी लावण्यासाठी मुरळीकर हे स्वतःत्या मुलांच्या परस्पर अर्ज करायचे,त्यामुळे सात ते आठ मुलांचे कल्याण झाले ते आज अधिकारी आहेत. चंद्रकांत रोज सकाळी ८ते १२ या वेळात एका कार्यकर्त्याकडून शासनाचे नोकरीविषयक,निर्णय, जीआर मिळवायचे, जिथे जागा असतील तिथे, त्या पोरांसाठी वेळ खर्ची घालायचे.यामागे त्यांची सामाजिक बांधिलकी, दयाभाव,परोपकारी वृत्ती दिसून येतो.

या विश्वनाथ दादामुळे आपल्याला शिक्षणाची संधी मिळाली,मुंबई नगरीत नोकरी मिळाली.त्या दादांच्या उपकारांची उतराई कशी करायची,याचा विचार करता चंद्रनाथला युक्ती सुचली.त्यांनी दादा दुग्धविकास मंत्री सुंदरराव सोळंके,सहकार मंत्री एन.डी.पाटील यांच्या भेटी घेवून दुग्ध डेअरीचा धंदा सुरु करुन दिला.१९८१ ला मुरळीकरांनी मुंबई सोडली. दादा,वहिणी,भावांची लग्न लावून दिली.

मुरळीकरांची १९८२ ला लातूरला बदली झाली. येथे आल्यानंतरही त्यांचा सामाजिक,संघटन कौशल्य भाव स्वस्थ बसू देत नव्हता.ऑल इंडिया एससी, एसटी बॅकवर्ड क्लास वेलफेअर असोचे ते लातूर-उस्मानाबाद-सोलापूर जिल्ह्याचे तीन वर्षे जनरल सेक्रेटरी राहिले. त्या माध्यमातून अन्यायग्रत मागास बँक कर्मचाऱ्यांसाठी ते त्या-त्या बँक अधिकाऱ्याशी झगडले.माधव अजनीकर यांच्याबरोबर बहुजन अधिकारी कर्मचारी महासंघाचे त्यांनी जिल्हाध्यक्ष म्हणून काम केले. काही काळ बामसेफमधून कार्य केले. १९८४ ला राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जनार्दन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली बँक कर्मचाऱ्यांचा मोठा यशस्वी मेळावा घेतला. बँक कर्मचाऱ्यांचे प्रमोशन,बदली,व अन्याय प्रकरणी सोनकांबळे,सी.ए.गायकवाड,मराठवाडा बँकेचे भालेराव, देना बँकेचे गायकवाड, विजयकुमार इंगळे यांच्यासोबत बरेच काम केले. प्रसंगी शाखाधिकाऱ्याचा विरोध केला.याचा परिणाम लातूर मधील काही दुखावलेल्या बँक अधिकाऱ्यांनी युनियन बँक ऑफ इंडियाच्या म्हणजे मुरळीकरांच्या नागपूरच्या मुख्य शाखेला सहा पानी खोटी तक्रार केली.त्यामुळे मुरळीकरांची नांदेडला बदली करण्यात आली.चांगल्या कामगार नेत्यांला अशी शिक्षा कशाबद्दल म्हणून,नागपूरच्या स्टेट बँकेचे पाटील यांनी मुख्यालयावर मोर्चा काढून मुरळीकर हे आमचे अत्यंत प्रामाणिक कर्मचारी, बँकेचे हित करणारे,कुशल संघटक आहेत त्यांची बदली का, म्हणून चेअरमन लोखंडे यांना जाब विचारला आणि आयबीआयला खरमरीत पत्र लिहिले.त्यामुळे पुन्हा लातुरला बदली झाली.

लातूरला आल्यावर युनियन बँक पतसंस्थेच्या चेअरमनपदाचा मुरळीकरांनी पाच वर्षे चांगला कारभार केला. पण पुन्हा वरिष्ठांनी डाव उगवत त्यांची डहाणू या आदिवाशी इलाख्यातील शाखेला बदली केली. तिथे ना खानावळ,ना हॉटेल,आदिवासी लोकांसोबत वडापाव खावून दिवसं काढावे लागले.एके दिवशी वरिष्ठ अधिकारी दिलीप देसाई यांना जनरल मॅनेजर खेमकांनी,मुरळीकर हा एक चांगला कर्मचारी आहे. त्याला अडगळीच्या ठिकाणी का टाकला ते बरोबर नाही,असे सुनावले त्यामुळे सोलापूर जिल्ह्यात चिखलठाणा येथे बदली झाली. पुढे लातुरला बदली झाली.पण...इथे आल्यानंतरही त्यांनी वेगाने कामाला सुरुवात केली.

पांडुरंग अडसुळे,मारुती चिरके यांच्या सहकार्याने मुरळीकरांनी विक्रम नगरात ज्ञानसाधना वाचनालयाचा पाया घातला.त्यासाठी पदरमोड सहन केली. विश्वशांती शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली.त्यातून स्वस्त धान्य दुकान सुरु केले.पुढे हे दोन्ही युनीट अजनीकरांनी अलगद स्वतःकडे घेतले.नांदेडचे कांबळे,संकपाळ,मोहन कांबळे यांच्या सहकार्याने एकता इंडस्ट्रीजची नोंदणी केली.त्यासाठी लातूर एमआयडीसीत एक एकर जागा मिळवली पण तेही मोडीत निघाले.महिलांना रोजगार मिळावा म्हणून महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था उभारली, शेळके,सोनवणे, अजनीकर,श्रंगारे,डोणे हे त्यात संचालक होते. राहायला घर तर हवेच म्हणून विक्रम नगरात बँक कॉलनी विकास कृती समिती स्थापून बँक वसाहत उभारली. शिक्षण क्षेत्रात योगदान द्यावे म्हणून शिवशक्ती समाज सेवा मंडळाच्या माध्यमातून बर्दापूरला श्री.शिवछत्रपती शाहू मागासवर्गीय अनुसूचीत जाती आश्रमशाळा काढली.ती दहावी पर्यंत आहे. पण त्या संस्थेतून त्यांना बाहेर काढण्यासाठी रात्री बेरात्री फोनवरुन धमकी देणे, बँकेत खोटे अर्ज देणे,असा प्रयत्न झाला. पण त्यांची खंत मुरळीकरांना नाही.

लातूरमध्ये वीरशैव कक्कय्या ढोर समाजाच्या सामूहिक वधू-वर परिचय आणि सामूहिक विवाह सोहळे आयोजनात आरंभी त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. जोशाबाचे सल्लागार म्हणून ते लातूरला काम करत राहिले.महाराष्ट्रीय चर्मकार संघाच्या जिल्हा सरचिटणीसपदी असताना मराठवाड्यात बाबासाहेब आणि गुरु रविदासांचे विचार सांगत राहिले. हे करतानाच त्यांची युतीचे मंत्री बबनराव घोलप यांची ओळख झाली.त्यांनी त्यांच्या महाराष्ट्रीय चर्मकार संघटनेत काम करण्याची विनंती करुन त्यांच्यावर मराठवाडा संघटक, लातूर जिल्हा निरीक्षक,राज्य सल्लागार,जिल्हा कार्याध्यक्ष,आणि आता राष्ट्रीय उपाध्यक्ष अशा जबाबदाऱ्या दिल्या.चालून आलेल्या जबाबदारीचे चिज करुन दाखवावे म्हणून संयोजक अंबादास गवळी,ॲड.सुरेश त्रिमुखे, चंद्रकांत कांबळे, सुशील माने, अडसुळे आदिंच्या सहकार्याने लातूरला समाजाचा दहा हजारांचा मेळावा घेतला.बाळा नांदगावकर,डॉ.विमल मुंदडा आदी यावेळी होत्या. मेळाव्याचे उद्घाटक समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप होते.त्यांच्यापुढे राष्ट्रीय चर्मकार समाजाच्या कार्यालयासाठी चेंबूरला जागा द्यावी, गटई कामगारांना मोफत टपर्या द्याव्यात. त्यांना पीच लायसन व नाममात्र भाड्याने धंद्यासाठी जागा द्यावी,संत रोहिदासाचा चौथीच्या पुस्तकात धडा सामील करावा,गाव तिथे संत रोहिदासांचे मंदिर असावे, चर्मकार समाजासाठी स्वतंत्र संत रोहिदास आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे, अल्प भुधारकांना ट्रॅक्टर, टेम्पो अनुदानावर द्यावेत, चर्मोद्योग महामंडळासाठी म.फुले आर्थिक विकास महामंडळाप्रमाणे भागभांडवल द्यावे,ढोर-चांभार समाजासाठी आश्रमशाळा आणि वसतीगृहे असावीत आदी चौदा मागण्या मांडण्यात आल्या.त्यातील बहुतांशी मागण्या मार्गी लागून समाजाचा उध्दार होण्यास मदत झालीय.प्रायोगिक तत्वावर मराठवाड्यात दहा आश्रमशाळा दिल्या,त्यात मुरळीकरांची बर्दापूरला असलेली आश्रमशाळा आहे.पण...मागे म्हटल्याप्रमाणे..

सी.के.मुरळीकर हे स्वस्थ बसणारे नाहीत,त्यांनी भारिप बहुजन महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष, बहुजन अधिकारी कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष म्हणून काम केले.गवई रिपाइंचे एस.के.कदम सोबत काम केले. एस.टी.महामंडळ कर्मचारी संघटना,परळी थर्मल पॉवर कामगार संघटनेमध्ये कामाचा ठसा उमटवला. त्यांचे व्यक्तिमत्व,वक्तृत्व आणि पारदर्शक कामामुळे नागपूरचे डॉ.चांगोले यांनी बसपा प्रमुख कांशीराम यांच्याकडे शिफारस केली.आणि थेट मा.कांशीराम यांची थेट बँकेत फोनवरुन ऑफर आली. तुम्हाला मुंबईत ऑफिस,गाडी देवू,बसपात काम करा,पण कौटुंबिक जबाबदार्यामुळे त्यास विनम्रपणे नकार दिला.

बँकेत अतिशय निरपेक्ष, पारदर्शक, कर्तव्यदक्ष राहून ,बँक हिताची सेवा त्यांनी केली. सेवानिवृत्तीला तीन महिने शिल्लक असताना कोणातरी हितशत्रूला हेवा वाटला आणि प्रकाश नगर, साबळेंच्या नावाने एक पाचपानी तक्रार मुख्य बँकेपासून खालपर्यंत व आरबीआयपर्यंत पाठविली.मुरळीकरांनी पाच लाख रुपये कर्ज मंजूर करुन देतो म्हणून,पाच हजार रुपये घेतले,बँकेत खाते काढायला गेले तर आता महारड्या वगैरे अपशब्द वापरुन खाते काढत नाही जा असे धमकावले,त्यामुळे त्यांची चौकशी व्हावी आदी मजकूर त्या अर्जात रेखाटला होता. सेवानिवृत्तीच्या तोंडावर आलेल्या या संकटाने ते हादरुन गेले. आता काही खरे नाही.पेन्शन, ग्रॅच्युईटी, फंड बंद होणार,म्हणून ते काळजीत पडले. यातून मार्ग काढण्यासाठी त्यांनी मुंबईतले शिवसेना कामगार नेते बबन काळे यांना हा खोडसाळपणा सांगितला. काळेंना युनियन बँकेचे मुंबई कार्यालय गाठून मुरळीकर असे करणारे नाहीत,कर्ज विभाग त्यांच्याकडे नसताना हे होतेच कसे?असे सांगनू त्यांना सेवानिवृत्ती दिवशी सर्व लाभ नाही मिळाले नाही तर बघून घेवू,अशी धमकी दिली. तिकडे नागपूरलाही संघटनेच्या पदाधिकार्यांनी आरबीआय ते बँक चेअरमन व सर्व संबंधितांकडे पत्रे पाठवून मुरळीकरांच्या सच्चेपणाबद्दल सांगून अन्याय दूर करायला भाग पाडले. त्यामुळे दि.३० जून २०११ रोजी वयांच्या ६० व्या वर्षी ते सर्व सवलतींच्या लाभासह निष्कलंक होवून सेवानिवृत्त झाले.

मुरळीला दादांचीही परिस्थिती सुधारली आहे.ते स्वस्त धान्य दुकानाचे तालुकाध्यक्ष राहिले. ग्रामपंचायत,पंचायत समितीवर त्यांनी काम केले.तालुका दक्षता समिती,खादी ग्रामोद्योगावर चेअरमन म्हणूनही काम करतात. पांडुरंग,विश्वनाथ यांची मोलमजूरी चालू आहे. मुरळीकरांना सकाळी फिरायला जाणे,सकाळी जेवन,दुपारी थोडा नास्ता, रात्री जेवण असा साधा आहार ठेवला आहे. रात्री वैचारिक पुस्तके वाचत झोपतात.घराचा परिसर स्वच्छ ठेवणे,गरीबांना सतत आर्थिक मदतीसह हातभार लावणे,तरुणांना रोजगार मिळवून देणे,स्वावलंबनाचे मार्गदर्शन करणे, सामाजिक अन्याय झाल्यास धावून जाणे, इतरांच्या चांगल्या कामाचे कौतुक करणे,सर्व पक्षातील चांगल्या नेते,कार्यकर्त्यांशी स्नेहाचे संबंध ठेवणे,अशी जीवननिष्ठा जोपासली आहे. उमरगाच्या श्रमजिवी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष,विठ्ठल साई साखर कारखान्याचे संचालक,काँग्रेस पक्षाच्या विविध पदांवर काम करणारे व पक्षात वजन असलेले मारोतीराव सूर्यवंशी यांची कन्या शकुंतला.तिचे दहावी पर्यंत शिक्षण झालेले. गुणी व कष्टाळू, तिच्याशी १९८१ ला चंद्रकांतचा गावी विवाह झाला. घरात चंद्रनाथ शिकलेला म्हणून संपूर्ण परिवाराच्या भल्या बुऱ्याची जबाबदारी, भावाच्या मुलाच्या नोकरीसाठी वा अन्य कामासाठी चंद्रनाथ सोसायटीचे कर्ज काढायचे, परंतु पत्नी शकुंतलाने कधी एकाही शब्दाने त्यांना विचारले नाही,की तुम्ही पगाराच्या पैशाचे काय करता?मुलांना दुधाला पैसे नसायचे. मित्र उसने द्यायचे ते पगार आल्यावर परत करायचे.पत्नीने कधी सोने,दागिने किंवा एखादी मौल्यवान वस्तूचा आग्रह धरला नाही.मला काहीही नको,तुम्ही आहात तेच खुप आहे. असे म्हणत ती आजही कष्ट उपसते.तिच्या अपार कष्टानेच माझे जगणे सुकर होण्यात सिंहाचा वाटा आहे, हे मी विसरु शकत नाही, अशी कृतज्ञता चंद्रनाथ आपल्या सहचारिणी शकुंतला विषयी व्यक्त करतात.

म.फुले,शाहू,फुले, रविदास या महापुरुषांच्या विचारांचा वारसा जपण्याचा प्रयत्न करणारे मुरळीकर यांनी आपली मुले उच्च शिक्षित बनवली, नव्हे तर त्यांना जीवनात स्थीर केले.थोरला प्रशांत एम.ए.,बी. एड. झालेला पण शिक्षण क्षेत्रातील भरमसाठ देगणी प्रथेला ठोकरून देत, स्वतःचे किराणा व भुसार मालाचे दुकान घालून दिलेय.प्रशांतही प्रसन्न मनाने यात गुंतला असून, त्यात नोकरीपेक्षाही अधिकपटीने नफा मिळवतोय.दुसरा मुलगा विशाल एल.एल.एम.नेट झाला असून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सरकारी वकील परीक्षेत जनरलमधून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाला असून, सध्या ते रेणापूरला सरकारी वकील म्हणून वडिलांचा प्रामाणिकपणा आणि स्वाभिमान जपत लोकसेवा करत आहेत.

तिसरा चेतन सिव्हील इंजिनिअर म्हणून मुंबई म्हाडा मध्ये कार्यरत आहेत. कष्टाळ पत्नी,निव्यर्सनी तिन्ही गुणी मुले,सुस्वभावी सुना, गावाकडील सर्वकाही ठिकठाक आहे.

राष्ट्रीय नेते बबनराव घोलप हे अनेक वर्षे शिवसेनेत कार्यरत असून,त्यांच्यामुळे मुरळीकर यांनी २०१५ च्या दरम्यान शिवसेना व्यापारी संघटना जिल्हा समन्वयक पदावर विराजमान झाले.संघटन कौशल्य असलेल्या मुरळीकरांनी यासाठी व्यापाऱ्यांच्या बैठका घेवून, त्यांचे प्रश्न समजावून घेवून ते संबंधित यंत्रणांकडे मांडून सोडवून घेण्यासाठी प्रयत्न केले. पुढे त्यांच्यावर शिवसेना जिल्हा सहसमन्वयक पदाची जबाबदारी सोपविण्यात आली. पक्ष संघटन,ताकद वाढविण्यासाठी त्यांनी माजी आ.दिनकर माने यांच्या सोबत जोराचे प्रयत्न केले,त्यासाठी तालुका पातळीवर जावून समन्वयाने काम केले.सर्वसामान्यांसह शेतकर्यांच्या प्रश्नाकडे त्यांनी लक्ष दिले.शेतकरी कर्ज माफीचा लाभ खर्यांना मिळाला का,पिक विमा मिळतो काय,यासाठी तहसील,जिल्हाकचेरीवर प्रसंगी मोर्चा,निदर्शने,अर्ज निवेदने आदी आंदोलनात त्यांनी हिरीरीने सहभाग नोंदविला.मध्यंतरी शिवसेना दुभंगली तरीही ते सत्तेमागे धावले नाहीत. कधीही मातोश्रीवर न येताही मुरळीकरांमधील सच्चा कार्यकर्ता,संघटन कौशल्य आणि पदाचा हव्यास नसणे या बाबी लक्षात घेवून पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांनी त्यांना चक्क लातूर जिल्हा शिवसेना सह संपर्कप्रमुख पदाची धूरा १४ महिन्याखाली सोपविली.या काळात ते गाव,तालुकास्तरावर जावून पक्षाचे संघटन वाढविणे,शिवसैनिकांच्या अडचणी जाणून घेवून सोडविण्याचा प्रयत्न करतात, कोरोनाच्या अडीच-तीन वर्षांच्या काळात मुरळीकरांनी सच्चे शिवसेना पदाधिकारी म्हणून कोरोनाग्रस्तांना दवाखान्यात कॉट,ऑक्सिजन मिळवून देणे,औषधी,इंजेक्शन मिळवून देणे इतर सुविधा मिळवून देत,कोरोनामुळे मयत झालेल्यांच्या परिवारांची भेट घेवून धीर देणे, आपल्या परीने मदत करत राहिले.

कोरोनामुळे हातावरचं पोट असलेल्यांचे जगणे अवघड झाले होते. विशेषत गटई कामगार अडचणी होते,तेव्हा मुरळीकरांनी स्वतः च्या पेन्शनची रक्कम दोन हजारांच्या २० नगांचे कीट तयार करुन ते जवळपास ८० गटई कामगार परिवारांना देवून जगण्याचा आधार देण्याचे पुण्यकर्म केले.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष म्हणून ते समाजावर झालेल्या अन्याय-अत्याचार प्रसंगी ते कार्यकर्त्यांना सोबत घेवून अन्यायग्रस्तांना मदत,धीर देत शासन,प्रशासनाकडे दोषींवर उचित कठोर कारवाई करण्यासाठी झटत आहेत.गरीब,निराधार,गटई कामगारांच्या पाल्यांच्या शिक्षणासाठी ते आपल्या परिने अर्थसाह्य करत असतात.

मधुमेह आणि गेली दोन वर्षांपासूनच्या गुडघेदुखीमुळे अधिक धावपळ करण्यात मर्यादा येत असल्या तरी मनाचा मोठा असलेला हा सत्शील माणूस प्रकृती सांभाळत इतरांच्या आनंदात आनंद मानत ,कोणत्याही जाती-धर्माच्या चांगल्या काम करणाऱ्यांना नियुक्ती,बढती मिळाली, सेवानिवृत्ती वा बदली असो,गुणी विद्यार्थी,कर्मचार्यांचा ते मनोभावे धावत जावून यथोचित सत्कार करतात. चंद्रनाथ उर्फ सी.के. मुरळीकर यांच्या अमृत महोत्सवी त्यांना निमित्त हार्दिक शुभेच्छा..

**बाळ होळीकर लातूर**
**९१७५१०३७६७**

# हेल्मेटमुळे डॉक्टरांचा जीव वाचला; मद्यधुंद कारचालकाविरुद्ध औसा पोलिसांत गुन्हा दाखल

**लातूर/प्रतिनिधी :** ''हेल्मेट वापरा, जीवन वाचवा'' औसा तालुक्यातील अपघातातून पुन्हा अधोरेखित झालेला महत्त्वाचा संदेश..

रस्ते अपघातांमध्ये हेल्मेटचे महत्त्व किती अनन्यसाधारण आहे याची प्रचिती औसा-लातूर मार्गावर घडलेल्या एका गंभीर अपघातातून पुन्हा एकदा आली आहे. भरधाव वेगाने आणि मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवणाऱ्या कारचालकाने मोटारसायकलला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने एक डॉक्टर गंभीर अपघातातून थोडक्यात बचावले. विशेष म्हणजे त्यांनी हेल्मेट परिधान केले असल्यामुळे मोठी जीवितहानी टळल्याची बाब समोर आली आहे.

दि. १० जून २०२६ रोजी दुपारी सुमारे ३.४५ वाजण्याच्या सुमारास औसा-लातूर रोडवरील नायरा पेट्रोल पंपाजवळ हा अपघात घडला. फिर्यादी डॉ. रंजीत गणपत नारायणकर (वय ३१ वर्ष), व्यवसाय डॉक्टर, रा. विवेकानंद चौक, लातूर हे आपल्या मोटारसायकलवरून प्रवास करत असताना इर्टिगा कार क्रमांक -२५ -६१४२ चा चालक पंडीत भारत पवार, रा. शिवणी चौक, धाराशिव याने मद्यप्राशन करून निष्काळजीपणे व भरधाव वेगात वाहन चालवत त्यांच्या मोटारसायकलला पाठीमागून जोरदार धडक दिली.

या अपघातात डॉ. नारायणकर जखमी झाले असून त्यांच्या मोटारसायकलचे सुमारे ४० हजार रुपयांचे नुकसान झाले. तसेच त्यांच्या पाठीवरील बॅगेमध्ये असलेले वैद्यकीय साहित्य व लॅपटॉपचे अंदाजे १ लाख ७४ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. एकूण सुमारे २ लाख १४ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच औसा पोलीस ठाण्याने तत्काळ कारवाई करत आरोपी वाहनचालकाविरुद्ध गुरनं ३०८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम २८१, १२५ (अ), १२५ (ब), ३२४(५) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे या अपघातातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे फिर्यादी डॉक्टरांनी हेल्मेटचा वापर केला होता. त्यामुळे गंभीर दुखापत किंवा जीवितहानी होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी झाली. अनेकदा दुचाकीस्वार हेल्मेट वापरण्याकडे दुर्लक्ष करतात, मात्र या घटनेतून हेल्मेट हे केवळ नियमपालनासाठी नसून जीवनरक्षक कवच असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

रस्ते अपघातांचे वाढते प्रमाण लक्षात घेता वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे, मद्यपान करून वाहन चालवू नये तसेच दुचाकीस्वारांनी दर्जेदार हेल्मेटचा नियमित वापर करावा, असे आवाहन औसा पोलिसांकडून करण्यात आले आहे. एक क्षणाची निष्काळजीपणा आयुष्यभराची वेदना ठरू शकते; मात्र हेल्मेटचा एक साधा निर्णय एखाद्याचा जीव वाचवू शकतो. औसा येथील ही घटना त्याचे जिवंत उदाहरण ठरली आहे.

# लातूर पोलिसांची अवैध शस्त्रांविरोधातील धडक मोहीम; ४५ हजार रुपये किंमतीचे गावठी पिस्टल जप्त

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच अवैध शस्त्र बाळगणाऱ्या व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यासाठी लातूर पोलीस दलाकडून सातत्याने विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. याच मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांच्या पथकाने केलेल्या धडक कारवाईत एका आरोपीस गावठी पिस्टल व मॅगझीनसह ताब्यात घेण्यात आले असून शस्त्र पुरवठा करणाऱ्या दुसऱ्या आरोपीविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. १० जून २०२६ रोजी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे निर्देशान्वये अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक श्री. माने यांचे पथकाला सायंकाळी गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती प्राप्त झाली की, एक इसम अनधिकृत गावठी पिस्टल बाळगून एलआयसी कॉलनी परिसरातील सुतमील झोपडपट्टी भागात संशयास्पदरीत्या थांबलेला आहे. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी तात्काळ सापळा रचला. पथकाने एलआयसी कॉलनी येथील सुतमील झोपडपट्टी परिसरात छापा टाकून संशयित इसमास ताब्यात घेतले. चौकशीअंती त्याचे नाव १) आकाश ऊर्फ मारी नवनाथ ऊफाडे (वय २६ वर्ष, रा. पळशी, ता. रेणापूर) असे असल्याचे निष्पन्न झाले. अंगझडतीदरम्यान त्याच्या कमरेस एक गावठी पिस्टल व मॅगझीन आढळून आले.पोलिसांनी तात्काळ गावठी पिस्टल व मॅगझीन जप्त केला. पुढील चौकशीत आरोपी आकाश ऊफाडे याने हे गावठी पिस्टल नानासाहेब अर्जुन ऊफाडे, रा. पळशी, ता. रेनापुर याच्याकडून विकत घेतल्याची माहिती दिली. त्यानुसार शस्त्र पुरवठादाराविरोधातही कारवाई करण्यात आली आहे.या प्रकरणी आकाश ऊर्फ मारी नवनाथ ऊफाडे व नानासाहेब अर्जुन ऊफाडे या दोघांविरुद्ध शस्त्र अधिनियम कलम ३(१)/२५ अन्वये पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

अवैध शस्त्र बाळगणे, विक्री करणे अथवा त्यांचा वापर करणे ही गंभीर स्वरूपाची बाब असून अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींविरुद्ध लातूर पोलीस दलाची कारवाई यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहणार आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. माने पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव जगताप, पोलीस अमलदार युवराज गिरी, मोहन सुरवसे, जमीर शेख, सिद्धेश्वर मदने, राहुल कांबळे, प्रदीप स्वामी, हरी पतंगे यांनी केली आहे.

# मानसिक आरोग्य क्षेत्रात करिअरची सुवर्णसंधी: अमृत मानस मित्रचे मोफत प्रशिक्षण

## ➤ रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध
## ➤ मानसिक आरोग्य क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम

आजच्या वेगाने बदलणाऱ्या शैक्षणिक आणि सामाजिक वातावरणामध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक ताणतणाव, भावनिक समस्या, वर्तनात्मक अडचणी, सोशल मीडिया व डिजिटल व्यसन, करिअरविषयक संभ्रम, तसेच मानसिक आरोग्याशी संबंधित विविध आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. आणि त्यामुळे अनेक गंभीर घटना आणि समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. अशा परिस्थितीत शाळा आणि महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षित समुपदेशकांची गरज मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ही गरज आणि समस्या लक्षात घेऊन अमृत या संस्थेने ही सामाजिक समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेतलेला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी मार्फत ''अमृत मानसमित्र समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम'' राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे ही महाराष्ट्र शासनाची मानसिक आरोग्य क्षेत्रातील अग्रगण्य संस्था तांत्रिक भागीदार म्हणून कार्यरत राहणार आहे.

ही मानसिक आरोग्य क्षेत्रातील शिक्षण, प्रशिक्षण, संशोधन आणि क्षमता विकासासाठी कार्यरत असलेली महाराष्ट्र शासनाची प्रमुख संस्था असून मानसशास्त्रज्ञ, समुपदेशक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध मानसिक आरोग्य व्यावसायिकांच्या प्रशिक्षणामध्ये संस्थेचा दीर्घ अनुभव आहे. या अनुभवाच्या आधारे प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम, प्रशिक्षण पद्धती, पर्यवेक्षण आणि गुणवत्ता नियंत्रणाची जबाबदारी मार्फत पार पाडण्यात येणार आहे.

अमृत संस्थेमार्फत '' समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम'' राबविण्यात येत असून मानसशास्त्र, समुपदेशन आणि सामाजिक कार्य क्षेत्रातील युवक-युवतींसाठी स्वयंरोजगार, व्यावसायिक विकास आणि समाजोपयोगी कार्याची रोजगार आणि स्वयंरोजगार यासाठी मोठी संधी उपलब्ध होत आहे.

### अमृत मानसमित्र समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रमात काय आहे?

अमृत मानसमित्र कार्यक्रमांतर्गत शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य, भावनिक स्वास्थ्य आणि जीवनकौशल्य विकासासाठी प्रशिक्षित समुपदेशक तयार करण्यात येणार आहेत.

### प्रशिक्षणामध्ये पुढील बाबींचा समावेश असेल

विद्यार्थी समुपदेशनाची मूलतत्त्वे, बाल व किशोर मानसिक आरोग्य, संवाद कौशल्ये व सक्रिय श्रवण, तणाव व्यवस्थापन व भावनिक स्वास्थ्य,जीवनकौशल्य शिक्षण, आत्महत्या प्रतिबंध आणि संकट व्यवस्थापन, सायबर सुरक्षा व डिजिटल आरोग्य, पालक व शिक्षकांसोबत समन्वय, मानसिक आरोग्य जागरूकता कार्यक्रमांचे आयोजन, शाळा आधारित समुपदेशन व रेफरल प्रणाली.

### प्रशिक्षणानंतर उपलब्ध होणाऱ्या संधी

शाळा व महाविद्यालयीन समुपदेशक, मानसमित्र समुपदेशक, जीवनकौशल्य प्रशिक्षक, मानसिक आरोग्य जनजागृती प्रशिक्षक, पालक व शिक्षक कार्यशाळा समन्वयक, विद्यार्थी कल्याण अधिकारी, स्वयंरोजगाराच्या माध्यमातून समुपदेशन सेवा प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना या क्षेत्रांमध्ये कार्य करण्याची संधी उपलब्ध होऊ शकते.

### कौशल्य विकास प्रशिक्षण

अमृत मानसमित्र अंतर्गत विद्यार्थी समुपदेशकांसाठी विशेष कौशल्य विकास प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. प्रशिक्षणामध्ये सैद्धांतिक ज्ञानासोबतच प्रत्यक्ष समुपदेशन कौशल्ये, केस स्टडी, रोल प्ले, सुपरव्हिजन, मार्गदर्शन आणि क्षेत्रीय अनुभव यांचा समावेश असेल.

### प्रशिक्षणाचे स्वरूप

प्रशिक्षणाचे स्वरूप हायब्रीड (ऑफलाइन + ऑनलाइन) असेल. १५ दिवसांचे प्रत्यक्ष वर्ग प्रशिक्षण. एक महिन्याची निरीक्षणाधारित क्षेत्रीय नियुक्ती, ऑनलाइन तज्ज्ञ सत्रे व केस चर्चा, सहा महिन्यांचे मार्गदर्शन व सुपरव्हिजन, यामुळे कार्यरत व्यावसायिक, विद्यार्थी आणि इतर इच्छुकांना प्रशिक्षणात सहभागी होणे सुलभ होईल.

### किती जणांना संधी आणि निवड प्रक्रिया कशी?

प्रत्येक जिल्ह्यातील गरज, विद्यार्थी संख्या आणि उपलब्ध संसाधनांचा विचार करून प्रशिक्षणार्थ्यांची निवड केली जाईल. सर्वसाधारणपणे प्रत्येक बॅचमध्ये किमान २० ते कमाल ३० उमेदवारांना प्रवेश दिला जाईल.

### पात्रता निकष

एम.ए./एम. एस्सी. मानसशास्त्र, एम.ए./एम. एस्सी. समुपदेशन मानसशास्त्र, मास्टर ऑफ सोशल वर्क (), अमृतच्या लक्षित गटातील उमेदवार असल्याचे पुरावे (डोमेसाईल, उत्पन्नाचा दाखला,जातीचा पुरावा).

### प्रशिक्षण स्थळ आणि निवासी व्यवस्था

सहा महिन्याच्या एकूण प्रशिक्षण कार्यक्रमापैकी पंधरा दिवस ऑफलाइन प्रशिक्षण हे महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे येथे होणार आहे. या १५ दिवसांसाठी निवास आणि भोजनाची व्यवस्था विद्यार्थ्यांनी स्वतः करायची आहे.

### मोफत प्रशिक्षण

अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांचा या सहा महिन्याच्या प्रशिक्षणाचा शैक्षणिक खर्च अमृत या संस्थेमार्फत केल्या जाणार आहेत. म्हणजेच अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांना मोफत प्रशिक्षण उपलब्ध होणार आहे.

### प्रशिक्षण प्रमाणपत्र आणि त्याचे फायदे

प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना ''अमृत मानसमित्र समुपदेशक'' हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल. या प्रमाणपत्राच्या आधारे उमेदवारांना :

शाळा व महाविद्यालयांमध्ये समुपदेशक म्हणून संधी, अमृत मानसमित्र उपक्रमाशी संलग्न होण्याची संधी, मानसिक आरोग्य व जीवनकौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये प्रशिक्षक म्हणून काम करण्याची संधी, स्वयंरोजगार व व्यावसायिक प्रगतीच्या नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

### अर्ज कसा करावा?

अमृत या संस्थेच्या वेबसाईटवर (https://mahaamrut.org.in/) अमृत मानस मित्र या योजनेअंतर्गत इच्छुकांना अर्ज करता येईल. यासाठी आवश्यक असलेले कागदपत्राचे पुरावे अपलोड करावे लागतील. अमृतच्या लक्षित गटातील पात्र उमेदवारांना 'प्रथम येईल त्याच प्राधान्य' या तत्त्वावर या प्रशिक्षणासाठी प्रवेश दिल्या जाईल.

### पहिल्या बॅचसाठी अर्जाची मुदत

अमृत मानस मित्र समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रमासाठी पहिल्या बॅच साठी ऑनलाईन अर्ज १५ जून ते २२ जून २०२६ या कालावधीमध्ये ऑनलाईन वर अर्ज करता येईल. छाननीअंती पात्र झालेल्या उमेदवारांना ईमेल/ मेसेज द्वारे कळविण्यात येईल. मुदतीत प्रवेश न घेतल्यास प्रतीक्षा यादीतील अन्य उमेदवारांना संधी दिल्या जाईल. अधिक माहितीसाठी या योजनेबाबत अधिक माहितीसाठी उमेदवारानी जिल्ह्यातील पहिला मजला, पित्रछया बिल्डिंग, मयुरेश्वर अपार्टमेंट, सिग्नल कॅम्प, विद्यानगर ,लातूर तालुका, जिल्हा लातूर-४१३५१२ संपर्क पत्ता :- संपर्क :- ७३९१०६५४७० अमृत कार्यालयाला भेट देवून जिल्हा व्यवस्थापकाशी संपर्क साधावा.

# संगीत नाटक अकादमीचे प्रतिष्ठित पुरस्कार जाहीर

## अशोक पत्की, आनंद भाटे, अरुण नलावडे यांच्यासह महाराष्ट्रातील दिग्गज व युवा कलावंतांचा राष्ट्रीय गौरव

नवी दिल्ली, दि. ११ : भारतीय संगीत, नृत्य, नाट्य आणि लोककलांच्या जतन व संवर्धनासाठी देशातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या 'संगीत नाटक अकादमी'च्या वतीने वर्ष २०२४ आणि २०२५ साठीचे प्रतिष्ठित 'संगीत नाटक अकादमी फेलोशिप', 'संगीत नाटक अकादमी पुरस्कार'; तसेच 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार' जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील अनेक ज्येष्ठ, दिग्गज; तसेच युवा कलावंतांनी राष्ट्रीय स्तरावर मानाचा सन्मान मिळवत राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा गौरव वाढविला आहे.

यंदाच्या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील संगीत, नाट्य, नृत्य, लोककला आणि पारंपरिक कला क्षेत्रातील अनेक मान्यवर कलावंतांचा गौरव करण्यात आला आहे. ज्येष्ठ कलावंतांसोबतच युवा कलाकारांनाही राष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळाल्याने महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला नवी ओळख मिळाली आहे.

वर्ष २०२४ मधील महाराष्ट्राचे पुरस्कार मानकरी

वर्ष २०२४ साठी जाहीर करण्यात आलेल्या संगीत नाटक अकादमी पुरस्कारांमध्ये हिंदुस्तानी शास्त्रीय गायन क्षेत्रातील ज्येष्ठ गायक अरुण कशाळकर आणि अभंग गायनासाठी प्रसिद्ध गायक आनंद भाटे यांचा समावेश आहे. अभिनय क्षेत्रातील योगदानासाठी अभिनेते अरुण नलावडे, पारंपरिक रंगभूमी क्षेत्रासाठी मुकुंद मराठे, लोकनृत्य क्षेत्रासाठी सुभाष नारायण नकाशे; तसेच नृत्य क्षेत्रातील संशोधन आणि अभ्यासपूर्ण योगदानासाठी शुभदा वरदकर यांची निवड करण्यात आली आहे. 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारां'मध्ये हिंदुस्तानी गायनासाठी कृष्ण बोंगाणे आणि अंकिता जोशी, भारूड या लोकसंगीत प्रकारासाठी भावार्थ रामचंद्र देखणे, बाहुलीनाट्य या दुर्मिळ लोककलेसाठी बाळकृष्ण गणपत मसगे आणि लोकनृत्य व लोकसंगीतासाठी चेतन वामन खेडेकर यांची निवड झाली आहे.

वर्ष २०२५ मधील महाराष्ट्राचे पुरस्कार मानकरी

वर्ष २०२५साठीच्या संगीत नाटक अकादमी पुरस्कारांमध्ये शहनाई वादनासाठी शैलेश भागवत, दिग्दर्शन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी प्रमोद डी. पवार, नाट्यसंगीत क्षेत्रातील दीर्घकालीन योगदानासाठी ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की; तसेच कथक नृत्य क्षेत्रातील विशेष कार्यासाठी मनीषा साठे यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे; तसेच 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारां'मध्ये हार्मोनियम वादनातील प्रभुत्वासाठी तन्मय देवचके आणि महाराष्ट्राच्या लोकपरंपरेतील जागर या लोकसंगीत प्रकारासाठी प्रवीण प्रताप जाधव यांची निवड करण्यात आली आहे.

या पुरस्कारांचे स्वरूप अत्यंत प्रतिष्ठेचे असून, अकादमी पुरस्काराचे स्वरूप १,००,००० रुपये, ताम्रपट आणि शाल असे आहे, तर युवा कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारांतर्गत २५,००० रुपये, ताम्रपट आणि शाल देऊन सन्मानित केले जाते. हे पुरस्कार राष्ट्रपतींच्या उपस्थितीत आयोजित विशेष समारंभात प्रदान करण्यात येणार असल्याचे अकादमीतर्फे कळविण्यात आले आहे.

# संत रोहिदास महामंडळाच्या कर्ज योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी २०२६-२०२७ या वर्षात '५० टक्के अनुदान योजना'(९ लाभार्थी) आणि 'बीज भांडवल योजना' (११ लाभार्थी) राबविण्यात येत आहे. कर्ज या योजनेच्या लाभासाठी इच्छुक लाभार्थींनी महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

कर्ज प्रस्तावासोबत अर्जदाराने जोडावयाची कागदपत्रे :-

१) जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रहिवाशी दाखला, रेशनकार्ड, आधार कार्ड, मतदान कार्ड.

२) शैक्षणिक दाखला, तीन फोटो कॉपीज, पॅन कार्ड, लाभार्थाचा उद्योग आधार प्रमाणपत्र

३) ज्या ठिकाणी व्यावसाय करावयाचा असेल त्या जागेचा पुरावा (जागेचे लाईटबील, टॅक्स/भाडे पावती/भाडे करारनामा/जागा वापर संमती पत्र किंवा मालकी हक्काचा पुरावा इ.)

४) कागदपत्र खरी असल्याबाबत लाभार्थ्यांचा विनंती अर्ज व ज्या जागी व्यावसाय चालू आहे त्याच जागेचे प्रमाणित केलेले छायाचित्र.

५) ग्रामपंचायत, नगरपालिका अथवा महानगरपालिका यांचे ना हरकत प्रमाणपत्र

६) व्यावसायासबंधी तांत्रिक प्रमाणपत्र तसेच अनुभवाचा दाखला

७) आवश्यकतेनुसार प्रकल्प अहवाल, सनदी लेखापालच्या सही व शिक्यासह

८) खरेदी करावयाच्या मालमत्तेच्या साहित्याचे जी.एस.टी. क्रमांक असलेले दरपत्रक (कोटेशन).

९) अर्जदाराचे वारसदाराच्या स्वाक्षरीसह नामांकन शपथपत्र (रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर)

१०) अर्जदाराचे तसेच जामिनदारांचे विहीत नमुन्यातील शपथपत्र (रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर)

११) लाभार्थाचा आधारकार्ड क्रमांक तसेच आधार संलग्न बँक खाते क्रंमाक

१२) दोन सक्षम जामिनदार (नोकरदार किंवा मालमत्ताधारक/शेतकरी)

१३) सक्षम दोन जामिनदार अ २ शासकीय जामिनदारांच्या कार्यालयाचे हमीपत्र अथवा ब २ शेतकरी /मालमत्ताधारक यांचे सात बारा/नमुना क्र. आठच्या उता-यावर सक्षम अधिका-याची सही व शिक्यानुसारची उतारे सोबत सह. दुय्यम निबंधक अथवा गर्व्हमेंट व्हल्युवर यांचे सबंधित मालमत्तेचे मुल्यांकन पत्र अथवा प्रमाणपत्र आवश्यक.

अर्जदार हा चर्मकार समाजातील (चांभार, मोची, ढोर, होलार आदी) असावा. यापूर्वी त्याने महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. इच्छुक लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्जाच्या तीन प्रती कार्यालयीन वेळेत जिल्हा कार्यालय, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई शहर, गव्हर्नमेंट लेदर वर्किंग स्कूल कंपाऊंड, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१ येथे स्वतः उपस्थित राहून मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसह कर्ज प्रस्ताव दाखल करावेत. या योजनांचा लाभ घेऊन समाजबांधवांनी आपली सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगती साधावी, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई उपनगर यांनी केले आहे.

# मतदार यादी मॅपिंगला मुदतवाढ द्या, बीएलओ वाढवा; खासदार वर्षा गायकवाड यांची मागणी

**मुंबई/प्रतिनिधी :** मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (एसआयआर) प्रक्रियेत कोणाचाही मतदानाचा अधिकार हिरावला जाऊ नये, मतदार यादी मॅपिंगसाठी अधिक वेळ द्यावा आणि संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे राबवावी, अशी मागणी काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी केली. दरम्यान, गुरुवारी (११ जून) निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत वर्षा गायकवाड यांनी विविध मुद्दे उपस्थित केले. ३० जून ते २९ जुलै दरम्यान बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) अधिकारी मुंबईमधील मतदारांच्या घरी भेटी देऊन माहिती गोळा करणार आहेत. या काळात मुंबईमध्ये मोठा पाऊस असतो. त्यामुळं बरेचदा पाणी साचणे, लोकल बंद पडणे अशा अडचणी येतात. या काळात अधिकारी घरोघरी जाऊ शकत नाहीत. ते दिवस वाया जाणं गृहीत धरावं. तसंच यादरम्यान आषाढी एकादशी येते, त्यामुळं वारीमध्ये सहभागी होण्यासाठी नागरिक सुट्टी घेऊन गेले असण्याची शक्यता आहे. त्यामुळं ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ देण्याची गरज असल्याचं वर्षा गायकवाड यांनी सांगितलं. याचबरोबर, मतदार यादीतून एखाद्याचं नाव वगळलं गेल्यास त्याला हरकती आणि कागदपत्रं सादर करण्यासाठी पुरेसा वेळ मिळायला हवा. तसंच फॉर्म १६ बाबत व्यापक जनजागृती करण्याची आवश्यकता असल्याचं वर्षा गायकवाड यांनी नमूद केलं.

ट्रान्झिट कॅम्पमध्ये राहणाऱ्या नागरिकांची नावं मतदार यादीतून वगळू नयेत, त्यांना ज्या ठिकाणी वास्तव्यास आहेत, त्याच ठिकाणी मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे, अशी मागणी देखील वर्षा गायकवाड यांनी केली. तसंच बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) यांची संख्या वाढवावी, नावं नेमकी कोणत्या निकषांवर वगळली जातात, याबाबत स्पष्टता असावी आणि बीएलए-१ व बीएलए-२ प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता ठेवावी, असंही वर्षा गायकवाड यांनी सांगितलं. याचबरोबर, अद्ययावत मतदार यादीची प्रत सर्व राजकीय पक्षांना वेळेवर उपलब्ध करून द्यावी आणि लोकप्रतिनिधींनाही या प्रक्रियेत सहभागी करून घ्यावे, अशी मागणी वर्षा गायकवाड यांनी यांनी केली.



एसआयआरच्या माध्यमातून प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे. स्थलांतर कागदपत्रांची कमतरता किंवा इतर कोणत्याही कारणामुळं कोणाचाही मतदानाचा हक्क हिरावला जाऊ नये, असे त्या म्हणाल्या. २० जूनपर्यंत १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या युवक-युवतींचा मतदार यादीत समावेश करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, असं वर्षा गायकवाड यांनी सांगितलं. दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाचे मुख्य अधिकारी एस. चोकलिंगम यांनी कोणाचंही नाव विनाकारण वगळलं जाणार नसल्याचं आश्वासन दिल्याचं त्यांनी सांगितलं.

याचबरोबर, फेरीवाल्यांच्या प्रश्नावरही वर्षा गायकवाड यांनी आवाज उठवला. बांगलादेशी आणि रोहिंग्या नागरिकांची आकडेवारी मागितल्यावर उत्तर मिळत नाही, मात्र कारवाईचा फटका सामान्य फेरीवाले, चहाचे टपरीवाले आणि गजरा विक्रेत्यांना बसत असल्याची टीका वर्षा गायकवाड यांनी केली. तसंच हातावर पोट असलेल्या या लोकांची परिस्थिती बिकट झाली असून त्यांना हक्काची जागा मिळाली पाहिजे. राजकारण करण्याऐवजी सामान्य लोकांना न्याय देण्यासाठी काम करा, असं आवाहन त्यांनी प्रशासन आणि महापालिका नेतृत्वाला केलं.

# तांदुळजा खुल्या क्रिकेट स्पर्धेतील आमदार चषक तिरंगा क्रिकेट क्लब मसला संघाने पटकावला

## यशस्वी संघांना भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते बक्षीस वितरण

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्ताने लातूर तालुक्यातील मौजे तांदूळजा येथे आयोजित करण्यात आलेल्या आमदार चषक खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत मसला येथील तिरंगा क्रिकेट क्लब सर्वप्रथम विजेता ठरला असून या स्पर्धेतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय संघांना बक्षीस वितरण करण्यात आले.

लातूर तालुक्यातील मौजे तांदूळजा येथे आ. रमेशआप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्ताने मोठ्या उत्साहाच्या वातावरणात आमदार चषक खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत तब्बल ३२ संघाने सहभाग घेतला होता. यशस्वी संघांना लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात भाजपाचे नेतआ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते रोख पारितोषिक, चषक, मेडल आणि सन्मानपत्राचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, भाजपाचे मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, सुरज शिंदे, अशोक सावंत, भैरवनाथ पिसाळ, बाबा भिसे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंचे आ. कराड यांनी कौतूक केले.

आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते स्पर्धेतील यशस्वी प्रथम क्रमांक तिरंगा क्रिकेट क्लब मसला ३१ हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांक श्री गणेशा क्रिकेट क्लब कानडी बोरगाव २१ हजार रुपये व चषक, तृतीय पारितोषक कॉमन वेल्थ क्रिकेट क्लब बोरडा ११ हजार रुपये व चषक मॅन ऑफ द सिरीज राहुल राठोड, मॅन ऑफ द मॅच समाधान सोनटक्के बेस्ट विकेट किपर विजय आल्टे यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी अंकुश गणगे, संतोष गायकवाड, नरेंद्र अल्टे, रामहरी भिसे, सचिन कांबळे, नुरखॉ पठाण, विष्णू कसबे, बाबा नवगिरे, बिभीषण शिंदे, शैलेश कसबे यांच्यासह विजयी तिन्ही संघातील खेळाडू व क्रीडा प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# MHT-CET (PCB) - 2026 परीक्षेत दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे घवघवीत यश

**लातूर/प्रतिनिधी :** दरवर्षीप्रमाणेच दयानंद विज्ञान महाविद्यालयाने MHT-CET परीक्षेच्या निकालाची उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. दि ०९ जून २०२६ रोजी MHT-CET(PCB) चा निकाल जाहीर झाला, त्यामध्ये चि. तिवारी शिवम या विद्यार्थ्याने MHT-CET परीक्षेत PCB ग्रुपमध्ये ९९.८६९८२४५ पर्सेंटाईल गुण घेऊन महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला आहे. त्याचप्रमाणे चि. पाटील वेदांत या विद्यार्थ्याने ९९.८३६२३०८ पर्सेंटाईल गुण घेऊन महाविद्यालयातून द्वितीय क्रमांक मिळविला आहे तर चि. जोशी अवधूत या विद्यार्थ्याने ९९.६३२००३३ पर्सेंटाईल गुण घेऊन महाविद्यालयातून तृतीय क्रमांक मिळविला आहे.

९९ पर्सेंटाईल पेक्षा जास्त गुण घेणारे एकूण ७ विद्यार्थी आहेत. ९८ पर्सेंटाईल पेक्षा जास्त गुण घेणारे एकूण ११ विद्यार्थी आहेत तर ९५ पर्सेंटाईल पेक्षा जास्त गुण घेणारे एकूण २७ विद्यार्थी आहेत आणि ९० पर्सेंटाईल पेक्षा जास्त गुण घेणारे एकूण ५२ विद्यार्थी आहेत.

या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष ललीतभाईजी शहा, उपाध्यक्ष रमेशकुमारजी राठी, सचिव रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव ॲड. श्रीकांतजी उटगे, सहाय्यक सचिव अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष संजयजी बोरा, शालेय समिती सदस्य मा. रवींद्रजी राठी, मा. प्रणवजी शहा, सी.ई.टी. सेलचे चेअरमन डॉ. चेतनजी सारडा, शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड, दयानंद विज्ञान महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे, उपप्राचार्य भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षक डॉ. हेमंत वरुडकर आणि पर्यवेक्षक डॉ. संध्या कोल्हे तसेच, प्रा. अनिलकुमार माळी, नीट समन्वयक डॉ कोमल गोमारे, सी ई टी समन्वयक कविता जाधव आदीसह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले आहे.

# प्रशासकीय इमारत परिसर म्हणजे कचऱ्याचे ढीग



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या प्रशासकीय इमारतीमध्ये, शेजारच्या जिल्हा परिषद परिसर, जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात विविध शासकीय कामाकरिता हजारो नागरिकांची ये जा असते.

परंतु सगळीकडे प्रचंड असा कचरा साठलेला दिसून येत आहे, जिल्हा परिषद च्या आतील भागामध्ये ठीक ठिकाणी चहा नाश्ता ज्यूस सेंटर उसाच्या रसाचे गाडे हे अवैद्यपणे व्यवसाय करत असतात.

व्यवसाय करीत असताना चहाचे कागदाचे कप, पाणी पिण्याचे प्लास्टिकचे ग्लास, प्लास्टिक बाटल्या, चहापत्ती, दुधाच्या रिकाम्या पिशव्या, नाष्टाच्या रिकाम्या प्लेटा, खरकट अन्न, लिंबू शरबतचे लिंबू असे विविध पदार्थ सगळीकडे फेकून दिलेले दिसून येतात.

शासकीय कार्यालयातील कागदांची तुकडे देखील सगळीकडे पडलेली आहेत.

लघुशंका करिता व्यवस्थित जागा नसल्यामुळे ठीक ठिकाणी दुर्गंधी येत आहे.

याच प्रशासकीय इमारत परिसरात व जिल्हा परिषद परिसरात पहाटेच्या वेळी हजारो लोक व्यायाम करिता योगासनाकरिता व फिरण्याकरिता येत असतात.

अशा या प्रशासकीय इमारती परिसरातील स्वच्छतेची वाईट अवस्था पाहून आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन सदस्यांनी आज प्रशासकीय इमारत परिसरातील एका भागाची प्रातिनिधिक स्वच्छता करून मागील कित्येक महिन्यांपासून साचलेली घाण दुर्गंधी यामध्ये हात घालून ती घाण काढून एका ठिकाणी जमा केली, जवळपास एक गाडी भरून घाण केरकचरा, दुर्गंधीयुक्त साहित्य एकत्रित करण्यात आले.

या निमित्ताने प्रशासकीय कार्यालय परिसर स्वच्छ ठेवावे, परिसर सुंदर ठेवावा अशी विनंती आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन सदस्यांनी केली आहे.

# ठाण्यात वृद्धाला मारहाण करणाऱ्या कॅब चालकावर गुन्हा; १४ तासांनंतर पोलिसांची कारवाई

**ठाणे :** ठाण्यातील ज्युपिटर रुग्णालयाबाहेर एका वयोवृद्ध व्यक्तीला बेदम मारहाण करण्यात आल्याचा व्हिडिओ सद्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या घटनेनंतर सोशल मीडियावर अनेकांनी संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणानंतर संबंधित कॅब चालकाविरोधात अखेर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रस्त्यावर थुंकल्याचा जाब विचारल्याच्या किरकोळ कारणावरून मारहाण करण्यात आल्याची घटना समोर आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी कॅब चालकाचे नाव निशांत धर शुक्ला असे आहे. मारहाण झालेल्या वृद्ध दाम्पत्याने स्वत: तक्रार दाखल न केल्याने शिवसेना कार्यकर्ते नितेश पाटोळे यांनी फिर्यादी बनून वर्तकनगर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. त्यानंतर पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला.या प्रकरणाची दखल घेत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे पोलीस आयुक्तांना कडक कारवाईचे निर्देश दिले होते.

# अन्नदान, गोसेवा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत संजय राजुळे यांचा वाढदिवस साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** सामाजिक कार्यकर्ते तथा संपादक संजय राजुळे यांनी आपला वाढदिवस समाजोपयोगी आणि पर्यावरणपूरक उपक्रमांनी साजरा करत समाजासमोर एक आदर्श निर्माण केला. वृक्षारोपण, अन्नदान, गोसेवा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत त्यांनी वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपली. वाढदिवसानिमित्त सकाळी साडेसहा वाजता वृक्ष प्रतिष्ठानच्या माध्यमातून २५१ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पर्यावरण संवर्धनाची शपथ घेऊन वृक्ष लागवड व संगोपनाचा संकल्प करण्यात आला.

त्यानंतर सकाळी ८ वाजता आणि दुपारी १२ वाजता जिल्हा शासकीय रुग्णालय (सिव्हिल हॉस्पिटल), लातूर येथे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी अन्नदान करण्यात आले. तसेच दुपारी १ वाजता विवेकानंद कॅन्सर हॉस्पिटल, लातूर येथे रुग्ण व गरजूंना अन्नदान करून समाजसेवेची परंपरा कायम ठेवली. सायंकाळी श्री गुरु गणेश जीवराज जैन गोशाळा येथे गोमातांना चारा वाटप करण्यात आला. यावेळी संजय राजुळे यांनी आजपासून कधीही प्लास्टिक पिशवीचा वापर करणार नाही असा संकल्प केला. तसेच उपस्थित नागरिकांना प्लास्टिकमुक्त जीवन जगण्याची आणि पर्यावरण संरक्षणासाठी सक्रिय योगदान देण्याची शपथ देण्यात आली.

विशेष म्हणजे, वाढदिवसानिमित्त कोणताही अनावश्यक खर्च न करता, फटाके न उडवता, हॉटेलमधील पार्टी अथवा दिखाऊ कार्यक्रमांना फाटा देत संजय राजुळे यांनी समाजोपयोगी उपक्रमांना प्राधान्य दिले. गोमातेच्या सान्निध्यात वाढदिवस साजरा करून अन्नदान, गोसेवा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. वाढदिवस हा केवळ आनंदोत्सव नसून समाजाप्रती असलेली जबाबदारी जपण्याची संधी असल्याचे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले.



या कार्यक्रमास समाजकल्याण विभागाचे सहआयुक्त अविनाश देवशटवार, जिल्हा कृषी अधीक्षक राजेंद्र कदम, वैष्णवी इंडोस्कोपी सेंटरचे डॉ. राजेश दरडे, सामाजिक कार्यकर्ते तथा बिल्डर धर्मवीर भारती, लायन्स क्लब ऑफ लातूर सिटीचे अनिल झंवर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच सामाजिक कार्यकर्ते तथा संपादक गंगाधर डिगोळे, मुद्दा लाईव्हचे संपादक दत्तात्रय परळकर, लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघाचे अध्यक्ष रविकिरण सुर्यवंशी, जिल्हा बातमी संपादक राम रोडगे, त्रिंबकआप्पा माळेवाडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष गुरुबस माळेवाडे, माधव तरगुडे, मनोज पटवारी, विरभद्र तरगडे, ओंकार कनकटे विविध क्षेत्रांतील मान्यवर, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षारोपण, अन्नदान, गोसेवा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. समाजोपयोगी कार्यातून वाढदिवस साजरा करण्याचा संजय राजुळे यांचा उपक्रम अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला.

# राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत विविध घटकांसाठी २२ जूनपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (गळितधान्य) सन २०२६-२७ अंतर्गत फ्लेक्झी फंड घटकातील विविध योजनांसाठी लातूर जिल्ह्यात अर्ज मागविण्यात येत असून, यासाठी २२ जून २०२६ पर्यंत संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे. या अभियानांतर्गत गोदाम बांधकाम व काढणी पश्चात पायाभूत सुविधांकरिता (तेलघाणा) ऑफलाईन, तर मिनी ऑइल मिल व एक्सपेलर या घटकासाठी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने शेतकरी, शेतकरी उत्पादक संघ, शेतकरी उत्पादक कंपनी आणि वैयक्तिक अर्जदारांना अर्ज करता येतील.

यातील गोदाम बांधकाम घटकासाठी सरकारी व खाजगी उद्योग, समूह आधारित व्यवसाय संस्था, शेतकरी उत्पादक संस्था किंवा कंपनी आणि सहकारी संस्थांना सहाय्य दिले जाणार असून यात सोयाबीन मूल्यसाखळी भागीदारांना प्राधान्य दिले जाईल. २५० मेट्रिक टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी येणाऱ्या अंदाजे २८ लाख ८० हजार २५० रुपये खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त १४.४० लाख रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल, त्याप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. ही बाब बँक कर्जाशी निगडित असल्याने अर्जदाराने रिझर्व्ह बँकेच्या अधिकृत वित्तीय संस्थेकडून (ज्या बँकेच्या शाखांना आयएफएससी कोड आहे) बँक कर्ज अनुदानाकरिता ग्राह्य धरून प्रकल्प सादर करणे आवश्यक असून, या घटकासाठी लातूर जिल्ह्याला ३ गोदामांचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे.

प्राथमिक तसेच दुय्यम स्त्रोतासाठी काढणी पश्चात पायाभूत सुविधा (तेलघाणा) अंतर्गत १० टन प्रतिदिन क्षमतेच्या तेल काढण्याच्या युनिट्सची (डिहलर, सीड क्लिनर, तेल काढण्याचे व गाळणी यंत्र) खरेदी व स्थापनेसाठी मदत दिली जाणार आहे. बीआयएस किंवा समकक्ष गुणवत्ता मानकांचे पालन करणारी आणि एकापेक्षा जास्त प्रकारच्या तेलबियांवर प्रक्रिया करण्याची क्षमता असलेल्या या यंत्रसामुग्रीसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल ९.९० लाख रुपये यापैकी जे कमी असेल ते अनुदान दिले जाईल. लातूर जिल्ह्याकरिता या घटकाचे १ उद्दिष्ट असून सरकारी व खाजगी उद्योग, वैयक्तिक लाभार्थी, शेतकरी उत्पादक संस्था व नोंदणीकृत कंपन्यांना याचा लाभ घेता येईल.

याव्यतिरिक्त मिनी ऑइल मिल आणि एक्सपेलर या घटकासाठी वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी व मूल्य साखळी भागीदारांनी महाडीबीटी पोर्टलवर कृषी यांत्रिकीकरण अभियानांतर्गत ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. यात फिल्टर प्रेससह असलेल्या युनिटसाठी ५० टक्के किंवा कमाल ४ लाख रुपये, तर फिल्टर प्रेसशिवाय असलेल्या युनिटसाठी ५० टक्के किंवा कमाल ३ लाख रुपये प्रति युनिट अनुदान अनुज्ञेय राहणार आहे. पात्र व इच्छुक लाभार्थ्यांनी या महत्त्वपूर्ण योजनांचा लाभ घेण्यासाठी विहित मुदतीत आपले अर्ज दाखल करावेत, असे कृषी विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

# २२ देशांचा इराणला आमच्या भूमीवरील हल्ले थांबवण्याचा इशारा

सिडनीः अमेरिका आणि युरोपीय राष्ट्रांसह २२ देशांनी गुरुवारी इराणला ''आमच्या भूमीवर''चे हल्ले थांबवण्याचा संयुक्तपणे इशारा दिलाय. तर दुसरीकडे युरोप, उत्तर अमेरिका आणि ऑस्ट्रेलियातील काही फुटीरतावादी गट आणि आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी टोळ्यांचा निंदनीय वापर केल्याबद्दल इराणच्या सुरक्षा यंत्रणांकडून निषेध करण्यात आला. ''आमच्या भूमीवर लोकांना ठार मारण्याचे, अपहरण करण्याचे, त्रास देण्याचे, धमकावण्याचे किंवा इतर प्रकारे हल्ला करण्याचे प्रयत्न राष्ट्रीय सार्वभौमत्व आणि आंतरराष्ट्रीय नियमांचं उल्लंघन करतात. या कारवाया तात्काळ थांबल्या पाहिजेत,'' असे या देशांनी एका संयुक्त निवेदनात इराणला म्हटले आहे.

# प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाला १० वर्षे पूर्ण

## विशेष आरोग्य शिबिरांमध्ये ३४५८ गरोदर मातांची तपासणी

**लातूर/प्रतिनिधी :** भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाद्वारे राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाला ९ जून २०२६ रोजी १० वर्षे पूर्ण झाली. ९ जून २०१६ रोजी सुरू झालेल्या या अभियानांतर्गत दर महिन्याच्या ९, १८ आणि २७ तारखेला गर्भवती महिलांना मोफत, सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण प्रसूतीपूर्व आरोग्य सेवा पुरविल्या जातात. गेल्या दहा वर्षांत उच्च जोखीम गर्भधारणा असलेल्या महिलांची लवकर ओळख, योग्य व्यवस्थापन आणि संदर्भ सेवा बळकट करण्यात या अभियानाने मोलाची भूमिका बजावली आहे. या महत्वपूर्ण टप्प्याचे औचित्य साधून देशभर 'पीएमएसएमए'ची १० वर्ष: सुरक्षित गर्भधारणा, निरोगी माता, सक्षम भारत या संकल्पनेअंतर्गत विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.




या विशेष दिना निमित्त लातूर परिमंडळाच्या आरोग्य उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड यांनी जवळा बु. (ता. लातूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन तेथील आरोग्य शिबिराचा आढावा घेतला. या शिबिरात एकूण ५२ गरोदर मातांची तपासणी करण्यात आली, तर १२ अतिजोखमीच्या मातांना विशेष सेवा व संदर्भ सेवा पुरविण्यात आल्या. यावेळी डॉ. रेखा गायकवाड यांनी उपस्थित मातांना आहार, विश्रांती आणि गरोदरपणातील धोक्याच्या लक्षणांबाबत मार्गदर्शन केले.

विशेष शिबिराच्या दिवशी ग्रामीण भागातील एकूण ३ हजार ४५८ गरोदर मातांना उपकेंद्र व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर आरोग्य सेवा देण्यात आल्या. यामध्ये ६५५ अतिजोखमीच्या मातांना विशेष उपचार व आवश्यकतेनुसार संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमावेळी प्रभारी सहायक संचालक (वैद्यकीय) डॉ. प्रीती बादाडे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी बरुरे, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. नितीन बोडके, वैद्यकीय अधिकारी डॉ. भताने, डॉ. तोंडारे, सी.पी.एम. पवन वाडेकर, संदीप यादव यांच्यासह आरोग्य केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.

**महाराष्ट्र शासन**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, लातुर यांचे कार्यालय**
**(दंडणीय विभाग)**

ईमेल आयडीः laturtahsildargmail.com
दुरध्वनी क्रमांक ०२३८२-२४२९६२
मेन रोड, लातूर ४१३५१२

जा.क्र.२०२६/कार्या/दंडणीय/मृत्यू/प्र.क्र.४६ दि. ३१.०५.२०२६

**विलंबाने मृत्यू नोंदीच्या आदेशाबाबत जाहीर प्रकटन**
**जाहीर सूचना**

याद्वारे कळविण्यात येते की मयत अनु जवानाराम जाट वय वर्ष १४ रा.महादेव नगर, सी.आर.पी.एफ कॅम्प, लातूर ता.जि.लातूर यांचे दि.०९.०२.२०२४ रोजी निधन झाले आहे. उक्त मयत व्यक्तीच्या मयताच्या दिनांकाबाबत व मृत्यूबाबत कोणाला कोणतीही हरकत असल्यास त्यांनी या प्रसिद्धीच्या दिनांकापासून १० दिवसाच्या आत निम्नस्वाक्षरीताकडे लेखी स्वरूपात कळवावा. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक: ३१.०५.२०२६**
**ठिकाण : लातूर**

स्वाक्षरित/-
**(सौदागर तांदळे)**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, लातूर**

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.